# मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी, २०२३
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष तेविसावे
अंक पहिला

## डॅमइट आणि बरंच काही



धडाकेबाज

महेश कोठारे

यांचा नवा

धुमधडाका

संपादन आणि शब्दांकन : मंदार जोशी

## पुरस्कारासाठी आवाहन



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता स्मृती साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

# 'प्रकाशक सुनील मेहता स्मृती साहित्य सृजन पुरस्कार'

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**२०,०००/-**



पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१. १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

२. १ ऑक्टोबर, २०२३ ते १ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पुरस्कारासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येतील.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली जाणार असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. तरी इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य दिलेल्या पत्त्यावर पाठवावे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जानेवारी २०२३ ◆ वर्ष तेविसावे ◆ अंक पहिला

**संपादक :**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक :**
शंकर सारडा

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **एक एक पान घडताना...** | **१०** |
| **विशेष लेख** | **१६** |
| **श्रद्धांजली** | **२३** |
| **प्रकाशन** | **२४** |
| **पुरस्कार** | **२५** |
| **साहित्यवार्ता** | **२७** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| शुभमंगल | २८ |
| निर्जन पूल | ३४ |
| फेलानी | ४८ |
| छोटा देश | ५२ |
| **अभिप्राय** | **५८** |
| **दिनविशेष** | **६२** |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

‘मेहता मराठी ग्रंथजगत’ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

सं

पा

द

की

य

# अजून येतो वास फुलांना

दोन हजार बावीसच्या जमा-खर्चासह २०२३मध्ये आपण प्रवेश केला आहे. या महिन्यातील बारा तारखेला सुनील मेहता यांना आपल्यातून जाऊन एक वर्ष होईल. गेल्या वर्षभरातील एकही दिवस त्यांच्या आठवणीशिवाय गेला नाही. मेहता पब्लिशिंग हाऊस त्यांनी आखून दिलेल्या मार्गावरच वाटचाल करत आहे. उत्तमोत्तम पुस्तकांच्या प्रकाशनाबरोबरच नवेनवे साहित्यविषयक प्रकल्प, कार्यक्रम यांच्या आयोजनातून ही वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे.

याच महिन्यात अकरा तारखेला ज्ञानपीठ पारितोषिक सन्मानित लेखक वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकर यांची १२५वी जयंती! खरं तर लेखक जिवंत राहतो तो त्याच्या साहित्याच्या माध्यमातून. त्याचंच एक मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वि. स. खांडेकर. आज त्यांना आपल्यातून जाऊन ४६ वर्षं उलटली. तरी आजही त्यांचं साहित्य त्याच उत्सुकतेने वाचलं जातं. नववाचक आपल्या वाचनाचा श्रीगणेशा प्राधान्याने खांडेकरांचं साहित्य वाचूनच करताना दिसून येतात. खांडेकरांनी लघुकथा, नीतिकथा, रुपककथा, कादंबऱ्या, समीक्षात्मक, निबंध व चित्रपटकथा अशा जवळपास सर्वच वाङ्मयप्रकारांत लेखन केलं आहे. त्यांपैकी त्यांच्या कथा, रुपककथा, लघुनिबंध व कादंबऱ्या



या साहित्यावर अनेक पिढ्या घडल्या. पर्यायाने त्या पोसल्या गेल्या, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. यातही कादंबरी व लघुकथेबद्दल त्यांना विशेष प्रेम होतं, हे जाणवतं. त्यांनी त्यांच्या लेखनाच्या प्रेरणांविषयी म्हटलं आहे की, 'मी चित्रपटाच्या कथा उदरनिर्वाहासाठी लिहितो. निबंध आणि नीतिकथा स्वत:च्या आनंदासाठी लिहितो. समीक्षा, लघुकथा आणि कादंबरी या वाङ्मय प्रकारांविषयी मला असा विश्वास आहे, की मानवी जीवाची सेवा या रूपबंधातूनच केली जाऊ शकते.'

तरुण लेखकांनी साहित्यविषयक पुस्तकातील दिग्दर्शनावर अवलंबून राहू नये, असं त्यांना वाटत होतं. उलट त्यांची अशी इच्छा होती की तरुण लेखकांनी उत्कृष्ट साहित्य वाचावं आणि त्याचा फायदा करून घ्यावा. खांडेकर कला आणि साहित्यामध्ये आधुनिक काळ आणि अभिव्यक्तीचा संदर्भ आणण्यासाठी इच्छुक होते. त्यांना सर्जनशील साहित्यात जेवढा रस होता तेवढाच रस साहित्याचं मूल्यमापन करण्यात आणि टीकेमध्येही होता. त्यांनी उमेदीच्या लेखनकाळातच वाङ्मयीन टीकाकार म्हणून स्वत:चं विशेष स्थान निर्माण केलं होतं.

आमच्या समृद्ध अशा ग्रंथसूचीत खांडेकरांची ११९ पुस्तके आहेत. त्यांचं समग्र साहित्य आजही आम्ही वाचकांना उपलब्ध करून देतो आहोत आणि आजही त्याला मागणी आहे, ही आमच्यासाठी नक्कीच आनंदाची बाब आहे. आजच्या काळातही खांडेकरांची पुस्तके वाचक त्याच उत्सुकतेने वाचतात. यातूनच त्यांच्या साहित्याची वर्तमानातील लोकप्रियता अधोरेखित होते. या लोकप्रियतेचं गमक खांडेकरांच्या लालित्यपूर्ण भाषेत आणि त्यांच्या चिंतनात आहे, असं म्हणता येऊ शकतं. 'अजून येतो वास फुलांना' या त्यांच्या लघुनिबंध संग्रहातील शीर्षक निबंधातील उतारा त्यांच्या भाषेतील लालित्याची आणि चिंतनाची साक्ष देतो. ते लिहितात, 'वार्धक्यात असं मुलखावेगळं काय आहे? मनुष्य हा सृष्टीचाच एक घटक आहे. मग जन्म, बाल्य, तारुण्य, प्रौढत्व, वार्धक्य, मृत्यू या जीवनातल्या ऋतुचक्राबद्दल त्यानं तक्रार का करावी? सहा ऋतूंपैकी जन्मभर वसंताचा फुलोराच माझ्या वाट्याला यावा किंवा मी सदैव शरदातल्या चांदण्यात नाहून निघावं, या हट्टाला वेडगळपणाखेरीज दुसरं कोणतं नाव देता येईल? चैत्रपालवीचा प्रवास एकदा सुरू झाला की तो माघातल्या पानगळीपर्यंत चालू राहावा, हा निसर्गाचा नियमच आहे. सृष्टीचे

अशाप्रकारचे कायदे मोडण्याचं सामर्थ्य महापुरुषांच्या अंगीही नसतं...‘बालपण ही रम्य परीकथा आहे, यौवन ही सुंदर प्रेमकथा आहे व वार्धक्य ही उदात्त तत्त्वकथा आहे!’ अशा ‘ज्ञानपीठ सन्मानित’ साहित्यिकाला मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वतीने विनम्र आदरांजली!

गतवर्षी अनेक नवनवीन पुस्तके वाचकांसमोर आणून ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ने आपला वेगळा ठसा प्रकाशन आणि साहित्य क्षेत्रात उमटवला. त्याला साजेसं एक नवं पुस्तक जानेवारी महिन्यातच आम्ही वाचकांपर्यंत पोहोचवणार आहोत; ते म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीत तब्बल पाच दशकांहून अधिक काळ प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या महेश कोठारे यांचं आत्मचरित्र -**‘डॅम इट आणि बरंच काही.’** या आत्मचरित्रातून महेशजींनी त्यांचं कौटुंबिक आणि व्यावसायिक जीवन उलगडलं आहे.

आत्तापर्यंत सुधा मूर्ती यांची २३ पुस्तके आपण अनुवादित केलेली आहेत. त्यांचं ‘हरवलेल्या गोष्टीचं रहस्य’ हे चोविसावं पुस्तकही याच महिन्यात प्रकाशित होत आहे. ‘The Magic of the Lost Story’ या पुस्तकाचा तो मराठी अनुवाद असून, ‘हरवलेल्या मंदिराचे रहस्य’ या पुस्तकाचा पुढील भाग आहे. या पुस्तकातून सुधा मूर्ती आणि नदी यांचं घट्ट नातं जाणवतं. तुंगभद्रा नदीच्या काठाने होणारा प्रवास एक नवं रहस्य उलगडत जातो. अनुष्का या रहस्याचा मागोवा घेते. लवकरच सुधा मूर्तींचं पंचविसावं पुस्तक वाचकांसमोर आणण्याचा आमचा मानस आहे.

आशय आणि विषयांच्या दृष्टीने विविधरंगी पुस्तकांच्या माध्यमातून मेहता पब्लिशिंग हाऊस वाचकांना सदैव आनंद देत राहील. सर्व रसिक वाचकांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

अखिल मेहता

डिसेंबर २०२२च्या अंकातील संपादकीयमध्ये ‘संवादु-अनुवादु’ या आत्मकथनाच्या कन्नड भाषांतरकाराचे नाव डॉ. उमा रामराव असे नजरचुकीने छापले गेले असून, त्याचा कन्नड अनुवाद **विरूपाक्ष कुलकर्णी** यांनी केला आहे, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. झालेल्या चुकीबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये**

***Available on***

play.google.com / store / books


www.amazon.in

**Find us on: facebook®**

https://www.facebook.com/mehtapublishinghouse



मेहता पब्लिशिंग हाऊस
BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!
टी बुक क्लब
आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

॥ स्वामी ॥
रणजित देसाई
नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
ebook
available on :
amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

## नवी संहिता... नवा आशय...

TBC-31 Book No. 4

# शल वी टेल द प्रेसिडेंट?

**जेफ्री आर्चर**

अनुवाद

**स्नेहा केतकर**




वाचकांच्या मनाची पकड घेत पानापानांतून उलगडत जाणारी रहस्यमय कादंबरी...

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


TBC-31 Book No. 5

# ऑनर अमंग थीव्हज

**जेफ्री आर्चर**

अनुवाद

**सई साने**




जेफ्री आर्चरच्या खुमासदार शैलीत पानापानात उलगडत जाणारी उत्कंठावर्धक कादंबरी

**किंमत : ७००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## ए क ए क पा न घ ड ता ना...



*– अनिल मेहता*

*भलेही पुस्तकं खूप जुनी असतील. वि. स. खांडेकरांचं साहित्य आजही उत्सुकतेनं वाचलं जातं. त्या पुस्तकांची आजही आवश्यकता आहे, असं मला वाटतं; कारण वि. स. खांडेकरांचं साहित्य, साहित्याबद्दलचे विचार, त्यांच्या प्रस्तावना, त्यांची एकंदरीत वाङ्मयसमीक्षा हे सगळंच फार मौल्यवान आहे...खांडेकरांची पुस्तकं रा. ज. देशमुखांनी बरीच वर्षं प्रकाशित केलेली नव्हती. त्यामुळं ती प्रकाशित होणं, हे अत्यंत आवश्यक होतं आणि ती मी केली नसती, तर ती कधीही प्रकाशित होऊ शकली नसती असं मला वाटतं.*

**वि. स. खांडेकरांची पुस्तकं, एक अनमोल ठेवा**

पुस्तकांमुळं शेवडे गुरुजींचे व माझे संबंध वाढले. माझ्याकडं ते कायम येत. अनेक वर्षांपासून ते वि.स.खांडेकरांचे लेखनिकही होते. वि.स. खांडेकर वारल्यानंतर त्यांच्या कन्या मंदाताईंकडेही त्यांचं जाणं-येणं असायचं. एकदा त्यांनी मला विचारलं,



“वि.स.खांडेकरांची पाच-एक पुस्तकं आहेत, ती तुम्ही प्रकाशित कराल का?”

मी उडालोच! अशी काही अपूर्व संधी

माझ्याकडं चालत येईल,अशी मी कल्पनाच केली नव्हती.

''का नाही? मी आनंदानं प्रकाशित करेन.'' मी लगेच म्हणालो.

पद्मभूषण वि. स. खांडेकरांच्या 'ययाति' या कादंबरीला 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळालेला होता. त्यांच्या 'ययाति' व 'अमृतवेल' या कादंबऱ्या मी वाचल्या होत्या. मला त्या खूप आवडलेल्या होत्या. माझ्या मनात त्यांच्याबद्दल एक वेगळा आदर होता. शिवाय असा एखादा लेखक आमच्या प्रकाशन संस्थेकडं असण्याचा खूप मोठा फायदा होता, आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ते कोल्हापूरचे होते.

शेवडे गुरुजींनी माझी व मंदाताईंची भेट घालून दिली. वि. स. खांडेकरांनी आपल्या पश्चात आपल्या पुस्तकांचे सर्व हक्क आपली मुलगी मंदाताई यांना दिले होते. त्या अतिशय प्रामाणिक. त्या चार बहिणी व एक भाऊ. मंदाताईंनी कुमारवाङ्मयाची पाच पुस्तकं आम्हाला दिली. मी ती पुस्तकं प्रकाशित केली आणि तिथून पुढं खांडेकर कुटुंबीयांशी माझा स्नेह वाढला. वि. स. खांडेकरांची आणखीही बरीच पुस्तकं होती. तीही मंदाताईंनी प्रकाशित करण्यास दिली.

मग बऱ्याच दिवसांनी एकदा मंदाताई वि. स. खांडेकरांच्या पुस्तकांबद्दल बोलल्या. त्या पुस्तकांचे हक्क 'देशमुख आणि कंपनी' कडे होते. ही स्वातंत्र्यपूर्व काळापासूनची प्रकाशन क्षेत्रातील प्रतिष्ठित अशी संस्था; पण वि. स. खांडेकर वारल्यानंतर रा. ज. देशमुखांनी मंदाताईंना अजिबातच रॉयल्टी दिलेली नव्हती. उलट त्यांच्याकडूनच पैसे यायचे आहेत, असा हिशोब त्यांनी मंदाताईंना दाखवला. तो कितपत खरा होता, हे मंदाताईंना माहीत नव्हतं. त्या नाराज होत्या. मंदाताईंनी मला खांडेकरांचं मृत्युपत्र दाखवलं. त्यांचं 'ययाति' हे पुस्तक लोकप्रिय होतं. त्यांची पुस्तकं चांगली जात होती; पण तरीही रॉयल्टी देत नव्हते. मला कुठंतरी अन्याय होतोय हे जाणवलं. त्यात आणखी एक घटना घडली. वि. स. खांडेकरांचं आत्मचरित्र रा. ज. देशमुखांनी खांडेकरांच्या पश्चात छापलं; पण ते छापताना काही गडबड झाली. त्यात मंदाताईंचीही

काही पत्रं छापली गेली, जे मंदाताईंना आवडलं नव्हतं. मी दादांकडं (रणजित देसाईंकडं) बोललो. दादा वि. स. खांडेकरांना गुरूस्थानी मानत असत. शिवाय वि. स. खांडेकरांच्या मृत्युपत्राचे तेही एक साक्षीदार होते. दादा प्रकाशकांना बोलले, ''तुम्ही हे जे काही करता ते बरोबर नाही.'' पण ते ऐकत नव्हते. नेमके त्याच वेळी 'श्रीमान योगी'चे पुढील हक्क दादांनी मला दिले होते व दोनशे-तीनशे प्रती मी प्रकाशकांकडून विकत घेतल्या होत्या व त्याचे पैसे मी देणे लागत होतो. देशमुखांनी सांगितलं,''तुम्ही ते पैसे खांडेकर कुटुंबीयांना द्या.'' मी तसं केलं. त्यानंतर दादांची सर्वच पुस्तकं मी विकत घेतली. त्याचेही पैसे खांडेकर कुटुंबीयांना देण्यात आले.

पण वि. स. खांडेकरांच्या पुस्तकांच्या हक्काबाबत वाद मिटला नव्हता. देशमुखांनी मंदाताईंवर दावा लावला. हे सगळं प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात गेलं. उच्च न्यायालयात मंदाताईंच्या बाजूनं निकाल लागला.

या सगळ्या प्रकरणात एकच महत्त्वाची बाब लक्षात आली, की लेखक आणि प्रकाशकात जे महत्त्वाचे करार होतात, ते योग्य तऱ्हेने झाले नाहीत, तर प्रकाशकालाही त्रास होतो आणि लेखकालाही. प्रकाशक आणि लेखक यांचे सबंध चांगले राहावेत यासाठी नुसते व्यवहार नसावेत, तर त्यांच्यात मैत्रीही असावी. मी दिल्लीत फेडरेशन ऑफ इंडियामध्ये सेमिनारला जायचो, तिथं मला हे नीट लक्षात आलं होतं. तेव्हापासूनच आम्ही लेखक - प्रकाशक करार व्यवस्थित करून घेण्यास सुरुवात केली होती. त्यामुळं आमचे आणि लेखकांचे संबंध व्यवस्थित आणि सुरळीत राहिले. त्या करारात लेखकाच्या व प्रकाशकाच्या जबाबदारीविषयी स्पष्टता व सामंजस्य असतं.

कोर्टात यश मिळाल्यानंतर मंदाताईंनी आम्हाला वि. स. खांडेकर यांच्या सगळ्या कादंबऱ्यांचे हक्क दिले. आम्ही ती सर्व

पुस्तकं प्रकाशित केली. खांडेकर कुटुंबीयांचा मला नेहमीच पूर्ण पाठिंबा होता.

त्यानंतर वि. स खांडेकरांची आणखी बरीच अप्रकाशित, दुर्मिळ पुस्तकं होती, तीही मी प्रकाशित केली. त्या वेळी काही लोकांनी मला विचारलं, ''तुम्ही खांडेकरांच्या पश्चात ही सारी पुस्तकं का प्रकाशित करताय? ही पुस्तकं काढून तुमचं नुकसान होईल.''

वि. स. खांडेकरांच्या पुस्तकांच्या प्रूफरीडिंगचं काम करणारे मोहन वेल्हाळ यांनाही शंका आली होती. एकदा रात्री आम्ही गप्पा मारत बसलो होतो. त्यांनी मला विचारलं,

''तुम्ही खांडेकरांची इतकी पुस्तकं घेतलीत तर तुम्हाला असं वाटतं का, की ही सगळी नक्की विकली जातील?''

''होय. मला पूर्ण खात्री आहे. शिवाय या पुस्तकांच्या आणखीन आवृत्त्या निघतील; कारण वि. स. खांडेकरांचं नाव मोठं आहे आणि ही पुस्तकं बरीच वर्षं उपलब्ध नव्हती. वाचकांपर्यंत पोचलीच नव्हती. प्रकाशकाचंच हे काम आहे, की आपली पुस्तकं लोकांपर्यंत पोहोचवावीत.''

मी त्यांना म्हटलं आणि तसंच घडलं. भलेही पुस्तकं खूप जुनी असतील. वि. स. खांडेकरांचं साहित्य आजही उत्सुकतेनं वाचलं जातं. त्या पुस्तकांची आजही आवश्यकता आहे, असं मला वाटतं; कारण वि. स. खांडेकरांचं साहित्य, साहित्याबद्दलचे विचार, त्यांच्या प्रस्तावना, त्यांची एकंदरीत वाङ्‌मयसमीक्षा हे सगळंच फार मौल्यवान आहे.

वि. स. खांडेकरांची पुस्तकं मला प्रकाशित करता आली यासाठी मी स्वत:ला भाग्यवान समजतो; पण एक खंत आहेच की, दुर्दैवानं त्यांची व माझी प्रत्यक्ष भेट किंवा परिचय कधीच होऊ शकला नाही. एकदाच आमच्या कोल्हापूर बुक सेलर्स असोसिएशनतर्फे एक कार्यक्रम होता व त्याचे प्रमुख पाहुणे म्हणून

त्यांना आम्ही बोलावलेलं होतं. तेव्हा तेवढं त्यांचं एकच भाषण मी प्रत्यक्ष ऐकलेलं आहे.

खरं म्हणजे १९४२ साली 'क्रौंचवध' ही कादंबरी लिहिल्यानंतर प्रकृतीच्या कारणामुळं वि. स. खांडेकर यांनी कादंबरीलेखन थांबवलेलं होतं. त्यांचा आत्मविश्वास कमी झालेला होता; पण रा. ज. देशमुख व त्यांच्या पत्नी सुलोचनाबाई यांनी प्रयत्नपूर्वक खांडेकरांना कादंबरीलेखनाला प्रवृत्त केलं. खांडेकरांनीच १९५३ साली देशमुखांना लिहिलेल्या पत्रात लिहिलं होतं,'लेखन करायला मी कचरत होतो...तुम्ही व सुलूताईंनी प्रेमाची पाखर घालून माझ्याकडून हे काम करवून घेतलंत, नाहीतर मी असाच कुचंबत राहिलो असतो.' त्यानंतर १९५९ साली 'ययाति' प्रसिद्ध झाली. तिला १९६० मध्ये 'साहित्य अकादमी'चं पारितोषिक मिळालं आणि पुढं १९७५ साली खांडेकरांना 'ज्ञानपीठ' पुरस्कारही मिळाला. त्यामुळं रा. ज. देशमुखांबद्दल मला आजही अतिशय आदर आहे. मराठीतले खूप मोठे प्रकाशक होते ते; पण खांडेकरांची पुस्तकं रा. ज. देशमुखांनी बरीच वर्षं प्रकाशित केलेली नव्हती. त्यामुळं ती प्रकाशित होणं हे अत्यंत आवश्यक होतं आणि ती मी केली नसती,तर ती कधीही प्रकाशित होऊ शकली नसती असं मला वाटतं. त्याचं कारण म्हणजे इतर कोणीही ते काम करण्यासाठी धजावलं नसतं.

आणि मुख्य म्हणजे मी सहसा कोर्टाच्या भानगडीत पडत नाही; पण माझे मित्र सुरेश नाईक यांच्यामुळं मी यात पडलो. तेसुद्धा यासाठी तेवढेच कारणीभूत ठरले.


◆

## नवी संहिता... नवा आशय...

# रहस्य प्राचीन नटराजाचे

**राधिका नाथन**

अनुवाद **डॉ. मीना शेटे-संभू**





पुरातत्त्व विभागाच्या लायब्ररीमध्ये महत्त्वाच्या पदावर असलेला अपंग टॉम चौल साम्राज्यातील नटराजाची खूप मोठी मूर्ती एका लिलावात विकत घेण्याचं ठरवतो आणि सुरू होतं एक रहस्यमय नाट्य...

**किंमत : ५२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# ऋणानुबंध

**सुनीता देवस्थळी**




मानवी नातेसंबंध...
त्यांतील गुंतागुंत...
रेशीमगाठी आणि दुरावा...
भावनिक आंदोलने...
यावर चढवलेल्या शब्दसाजातून
साकारलेल्या कथा.

**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

वि

शे

ष

ले

ख

# कोत्तापल्ले सर...माझे सुहृद

नागनाथ कोत्तापल्ले आणि माझी जवळची मैत्री होती, हे बऱ्याच जणांना सांगितले तर खरे वाटणार नाही.

आमच्या मैत्रीचे जवळचे साक्षीदार म्हणजे मनोहर जाधव. आम्ही पूर्वी खूप वेळा एकत्र भेटायचो. मग सर, कुलगुरू झाले. त्यानंतर आम्ही पाच वर्षे दोन-तीन वेळाच भेटलो. सर परत पुण्याला आले. मग आमच्या भेटी वाढल्या. मी त्यांना पहिल्यांदा 'सर' असं म्हणालो, त्यावेळी त्यांनी मला म्हटले, "गुरुजी, हे सर प्रकरण काय आहे?" ते 'गुरुजी' म्हणत त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावर एक मिश्किल हास्य चमकून जाई.

मी आणि अनिल मेहता एकदा मेहतांच्या पेरुगेट जवळच्या ऑफिसमध्ये माझ्या आगामी पुस्तकाबद्दल बोलत होतो. तेवढ्यात एक तरुण गृहस्थ तिथे आले. प्रथमदर्शनी लक्षात आल्या त्या त्यांच्या भरघोस मिशा. अनिलनी विचारलं,"तुम्ही यांना ओळखत असालच?" माझ्या चेहऱ्यावर उमटलेले प्रश्नचिन्ह पाहून अनिल म्हणाले,"हे प्राध्यापक नागनाथ कोत्तापल्ले." मी त्यांचे औरंगाबादच्या 'लोकमत' दिवाळी अंकातील लेख वाचत असे. आमचा दोघांचा मित्र महावीर जोंधळे तेव्हा 'लोकमत'च्या औरंगाबाद आवृत्तीचा कार्यकारी संपादक होता. सरांचं ललित लेखन आणि मराठवाड्यातील ग्रामीण जीवनावरील लेख वेगळ्याच जगात नेत असत. त्यातल्या एक-दोन घटना मला अजून आठवतात. रझाकारांना भिऊन एका कुटुंबातील काही सदस्य पळून गेले. जे पळून जाऊ शकले नाहीत ते मुसलमान झाले. निजामशाहीचा अंत झाल्यावर पळून गेलेले परतले. तेव्हा त्यांच्या आता मुस्लीम असलेल्या कुटुंबीयांनी प्रेमाने त्यांना घरात घेतले. नंतर त्या वाड्याचे दोन भाग करून ते राहू लागले. एकमेकांचे सणवार ते एकत्र साजरे करीत.



दुसरी एक गोष्ट सरांनी एकदा गप्पांच्या ओघात

सांगितली. गावात एखादे वडाचे किंवा उंबराचे झाड काही कारणाने तोडायची वेळ आली तर ते काम गावातल्या मुस्लीम व्यक्तींना सांगितलं जायचं. त्यांना हिंदू समजुती त्रास देत नसाव्यात. सर, अशा बऱ्याच हकीकती सांगत असत तर सर मला 'गुरुजी' का म्हणत, ते सांगत होतो. 'विज्ञान' म्हणजे काहीतरी अवघड असणार, अशी आमची समजूत होती. तुम्ही इतक्या सोप्या भाषेत ते समजावून देता,ते कसं जमतं? कथाही वेगळ्याच असतात. आम्हाला असं काही असेल, याची कल्पनाच नव्हती. 'विज्ञानकथा' म्हणजे 'रहस्यमय कथा,' अशीच आमची समजूत होती.' मी त्याबद्दल मग त्यांच्याशी सविस्तर बोललो. विज्ञानाची एवढी माहिती आहे, हे पाहून ते आश्चर्यचकित झाले होते. तेव्हापासून ते मला 'गुरुजी' म्हणू लागले. त्यानंतर जेव्हा जेव्हा काही चर्चासत्र होणार असेल किंवा कार्यशाळा असेल, तर ते असतील तिथे मला आवर्जून बोलवू लागले. त्यांच्या मते, आम्ही समदु:खी होतो. समीक्षक आणि कवींना विनोदाचे वावडे असते, असाच गैरसमज विज्ञानाच्या बाबतीत असतो, त्यामुळे आपली मैत्री असावी, असं ते म्हणत. सर पुण्यात आल्यावर मी 'विज्ञान विभागा'पेक्षा 'मराठी विभागात'च जास्त वेळ जाऊ लागलो. हीच परंपरा मनोहर जाधवांनी सुरू ठेवली. एक दिवस अचानक सर जयदेव डोळेला घेऊन माझ्याकडे आले. आम्ही भेटायचो ते चित्रशाळेत आमच्या जुन्या घरी. तिथं मी लिहायला बसे. सर म्हणाले,''उद्या मला राज्यपालांनी इंटरव्ह्यूसाठी बोलावलं आहे. कुलगुरू पदासाठी मुलाखत आहे. कुठले 'विज्ञान प्रकल्प' सुरू कराल, असं विचारलं तर काय सांगायचं? ह्याचे धडे घ्यायला आलोय.' मग जवळजवळ दोन तास आमची चर्चा झाली. सर प्रश्न विचारत, त्यावर मी बोलेन त्याच्या नोट्स काढत. माझी दोन पुस्तके 'विज्ञानाचे शतक' आणि 'एकविसावे शतक' मी त्यांना दिली. त्यांनी ती रात्री उशिरापर्यंत जागून चाळली. तज्ज्ञ समितीचे सदस्यही त्यांना विज्ञानाची एवढी जाण आहे, हे बघून आश्चर्यचकित झाले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी फोन आला. सर, 'बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा'चे 'कुलगुरू' म्हणून जाणार होते. विद्यार्थी चळवळीत नेतृत्व करणारी व्यक्ती त्याच विद्यापीठात 'कुलगुरूपद' भूषविणार, ही एक अद्भुत घटना होती. या माझ्या मित्राला आदरांजली!

**– निरंजन घाटे**

## जगण्याच्या आविष्काराला मी कला मानतो - लक्ष्मण माने

*'उपरा' या लक्ष्मण माने यांच्या आत्मकथनाला बेचाळीस वर्षं झाली. 'उपरा'ला मिळालेल्या प्रतिसादानंतर त्यांचे पत्रकार मित्र अरुण खोरे यांनी दैनिक 'सकाळ'साठी त्यांची प्रदीर्घ मुलाखत घेतली होती. ११ ऑक्टोबर, १९८१रोजी ती प्रकाशित झाली. त्या मुलाखतीचा हा आशय. त्यातून माने यांचं कार्य आणि त्यांचे विचार यांवर प्रकाश पडतो.*

साताऱ्याच्या अजिंक्यच्या पायथ्याशी पावसाळी ढगांनी झाकोळलेली दुपार. लक्ष्मण मानेला भेटण्याच्या अनिवार कुतूहलापोटी इथपर्यंत आलेलो. उपरा प्रसिद्ध होण्याच्या वर्ष-सव्वा वर्ष पूर्वी लक्ष्मण मानेची अप्रत्यक्ष गाठ पडलेली. गप्पांतून दलित साहित्य संसदेच्या संमेलनात सातारचा प्रमोद कोपर्डे भेटला आणि संमेलनातल्या एका रात्री लक्ष्मणची कहाणी त्याने सांगितली, तेव्हापासून ही कहाणी संपूर्णपणे वाचण्यासाठी मी आसुसलेलो. आणि 'उपरा'च्या प्रसिद्धीनंतर ते वाचताना अनुभूतीच्या खोल डोहात प्रवेशलेलो. त्यानंतर प्रत्यक्ष भेटीची वेळ ठरवूनही इतक्या उशिरा आज प्रमोदबरोबर लक्ष्मणच्या घरी आलेलो.

फोर्ड फाउन्डेशनच्या घसघशीत शिष्यवृत्तीचा सन्मान लाभलेला लक्ष्मण आनंदून गेला, हे स्वाभाविकच आहे; पण लक्ष्मणच्या डोक्यात हवा गेली नाही. तो जमिनीवर निश्चयाने ठामपणे उभा आहे.

तो म्हणतोच मुळी, 'आम्ही खरे भूमिपुत्र आहोत!' साताऱ्यातल्या त्याच्या छोटेखानी घरात चैतन्य निर्माण झालं आहे. त्याची जोडीदारीण शशीताई खुशीत आहे. त्याची दोन मुलं भाई आणि समता आई-वडिलांच्या आनंदानं बागडताहेत.

लक्ष्मणचं बोलणं हा एक चढाईचा अनुभव आहे. घरातल्या भिंतीवर असलेल्या महात्मा फुले, राम मनोहर लोहिया, हमीद दलवाई, भाऊराव पाटील यांच्या प्रतिमा त्याला विचारांच्या ठोसपणाची ताकद देत असाव्यात. गेली सात-दहा वर्षं समाजवादी युवक दलाच्या चळवळीमुळे त्याच्यातल्या कार्यकर्त्यात बोलण्याची धार निर्माण झालेली आहे. शिडशिडीत बांध्याच्या

लक्ष्मणचं उठून दिसणारं नाक त्याचं व्यक्तिमत्त्व उभं करतं. परिवर्तनाच्या चळवळीतला तो एक शिलेदार आहे आणि आपल्या या शिलेदारीचा त्याला रास्त अभिमान आहे.

'उपरा'च्या यशाच्या निमित्ताने त्याच्यातला लेखक बोलू लागला आहे. चार-चार तासांच्या पांढरपेशी चर्चेत मोठ्या आक्रमकतेने आपला मुद्दा मांडू लागलाय. सन्मानाच्या उंच पायऱ्यांवर जाताना आपल्या समाजाच्या स्पंदनाचे भान त्याच्या धगधगत्या मनाला आहेच. प्रस्थापित जातिव्यवस्थेला टक्कर देऊन आज त्याचं कौटुंबिक जीवन सुरळीत चाललं आहे आणि त्याची वाटचालही तेवढ्याच निर्भयतेने सुरू आहे.

''उपरा' प्रसिद्ध झाल्यानंतर कैकाडी समाजातून काय प्रतिक्रिया आल्या?' या प्रश्नावर लक्ष्मणनं सांगितलं, 'अनेक सुशिक्षितांकडून काहीच प्रतिसाद आला नाही. जमातीत पुस्तक फार थोड्यांनी वाचलेलं असेल. काही भटक्या समाजाच्या कार्यकर्त्यांकडून पत्रं आली; मात्र आता लवकरच भरणाऱ्या जत्रेमध्ये कैकाड्यांच्या न्यायपंचायतीसमोर माझा विषय येईल आणि बहुधा ते मला बहिष्कृत करतील. आज मी आणि समाज पूर्णपणे वेगळ्या जगात आहोत. वडील मला म्हणाले, 'तुझ्या मुलाला कोण मुलगी देईल? तू मेलास तर खांदा कोण देईल? कारण या समाजात बहिष्कृत केलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांची अवहेलना करणाऱ्या, अपमानित करणाऱ्या शिक्षा दिल्या जाऊन त्यांना अगतिक केलं जातं.'

फोर्ड फाउन्डेशनच्या शिष्यवृत्तीमुळे भटक्या समाजात जन्मलेल्या या नायकाची भ्रमंती आणखी वाढणार आहे. दोन वर्षं साऱ्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेल्या, गाढवावर बिऱ्हाड लादून, पालं ठोकून आयुष्य जगणाऱ्या भटक्या लोकांशी संवाद करीत लक्ष्मण फिरणार आहे. महाराष्ट्रातल्या दोन-चार जिल्ह्यांतली माहिती त्याला आहे. बाकी ठिकाणांची माहिती प्रत्यक्ष भटकूनच मिळवली जाईल. महाराष्ट्रातल्या एकूण भटक्या समाजाचे एक खरे आणि अभ्यासपूर्ण असे चित्र या शिष्यवृत्तीच्या आधारे लक्ष्मण रेखाटणार आहे.

अण्णा भाऊ साठे आणि अनिल अवचट यांच्या पुस्तकांनी आपल्याला जाणिवेच्या पातळीवर अस्वस्थ केलं, असं लक्ष्मण म्हणतो. या जाणिवेतूनच आपण आता भटक्यांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करणार असल्याचा निर्धार त्यांनी

केला आहे. या समाजात शिकणारा वर्ग फार कमी. शासन दरबारी समाजाची नोंद नाही. त्यामुळे विकास योजनांची फळे या समाजाला चाखायला कशी मिळतील, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्याचबरोबर या समाजाला राजकीय जाणीव नसल्याने त्यांच्याकडे सहज दुर्लक्ष करता येतं. भटके असल्यामुळे समाजाचं दुर्लक्ष होतंच, ही खंत त्यांनी व्यक्त केली.

लक्ष्मण पुढे सांगू लागला...

'माझ्यापेक्षाही गुणवान लोक या समाजात आहेत. त्यांना समान संधी जाऊ द्याच, साधी संधीही मिळत नाही. आमच्या समाजात वाद्य सुंदर वाजवणारे कलाकार आहेत. अहो, महाराष्ट्रातील बहुतेक लग्नं हेच कलाकार वाजवतात ना! त्यांच्यातल्या कुणालाही ऑर्केस्ट्रात स्थान का नाही मिळत? त्यांच्या जीवनाचं मातेरं होऊन जातं रे!'

बोलण्याच्या आवेगात त्यानं साहित्य आणि जीवन यांच्या संबंधाविषयीचा आपला दृष्टिकोन तपशीलवार सांगितला.

'शेवटी कला म्हणजे काय? जगण्याच्या आविष्काराला मी कला मानतो. अशा कलेला भाषेची Merits काय लावणार? दलित साहित्यातली भाषा ही महारा-मांगांची भाषा आहे, असं समजलं जातं. हे चूक आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातली ही भाषा आहे. शहरातली ब्राह्मणी भाषा ही उच्च-सुसंस्कृत असा भ्रम तयार करण्यात आला आहे. अशा लोकांना साहित्य आणि समाजाचा संबंध कसा कळणार?

कार्यकर्ता म्हणून गेली दहा वर्षं काम करतोय. लेखक झाल्यापासून मला मिळणाऱ्या 'ट्रीटमेन्ट'मध्ये खूप फरक पडला आहे. पुण्यात अनेकदा जातो; पण आता वेगळ्या तऱ्हेने बघितलं जातं. लोकांना पैसा, प्रतिष्ठेचं फार आकर्षण असतं. फोर्ड फाउन्डेशनची बातमी प्रसिद्ध झाल्यापासून अशीच गर्दी वाढली. अरे, माझ्या आजारी मुलाला तपासायला इतक्या लांबवर डॉ. नरेंद्र दाभोलकरांखेरीज कोणीतरी येईल का? लेखन, पारितोषिक यामुळे मला, मी औपचारिकतेच्या, ग्लॅमरच्या चक्रात अडकतो की काय असं वाटतं.

साहित्य आणि समाजाच्या अनुबंधाचं वेगळं परिमाण लक्ष्मणच्या बोलण्यातून सापडतं की काय असा विश्वास वाटू लागतो. स्वच्छ सामाजिक विचाराशी त्याच्या अंत:करणातल्या तळमळीचं नातं आहे.

तो म्हणतो –

‘दर एक माणूस हा साहित्याचा विषय आहे. डोंबाऱ्याच्या पोरींचा खेळ बघताना तुम्ही कितीही कामात असला तरी तिकडे डोकावून जाता. लोक तल्लीन होतात. ही कला नाही का? रस्त्याने जाताना तुम्ही तुमच्या व्यापात असूनही गारुड्याच्या आवाजासरशी थांबता, त्याचा खेळ बघता. ही कला नाही का? म्हणून मला वाटतं तारेवर कसरत करणारं, काठीवर उचललं गेलेलं डोंबाऱ्याचं पोरगं जेव्हा लिहील तेव्हा आणखी वेगळी जाणीव मराठी साहित्यात ताकदीने उमटेल. तळागाळातील प्रत्येक माणसाचा भोगवटा एवढा प्रचंड आहे की, विश्वकादंबरी त्यातून जन्म घेईल. जगण्याचा आवाकाच इतका प्रचंड आहे. म्हणून मीही हे म्हणतो.

पुढे उसळून लक्ष्मण म्हणाला, ‘आता जर आम्हाला कोणी प्रतिभा वगैरे कल्पनेबद्दल सांगू लागला तर ते पटणार नाही आणि आम्ही ऐकून घेणार नाही. अरे, प्रतिभा कोणा गाढवीचं नाव आहे, ‘जे न देखे रवि ते देखे कवि’ असं जर असेल तर मग तळाच्या समाजजीवनाकडे या मध्यमवर्गीय साहित्यिकांची नजर कशी गेली नाही? दिसतं ना सगळं त्यांच्या प्रतिभेला? मग केवळ मध्यमवर्गीयांची दु:खं चोथा होईपर्यंत यांनी कशी आळवली? मला तर वाटतं, जी प्रतिभा वास्तवाचा विसर पाडते, ती तर अफूची गोळी! वास्तवतेचे भान जिला आहे तिला मी प्रतिभा म्हणेन. तेव्हा उगाच प्रतिभेच्या वावदूक वेगळेपणाच्या गप्पा करू नयेत.

समाजवादी युवक दलाचा कार्यकर्ता म्हणून आपण आजही कोणत्या सामाजिक प्रश्नांची चर्चा करतो आणि प्रत्यक्ष चळवळीत काम करतो, याविषयी लक्ष्मणने बरंच काही सांगितलं. पुरोगामी चळवळीत खालच्या म्हणून मानल्या गेलेल्या माझ्यासारख्या कार्यकर्त्यांना धोका नाही. सवर्णांमधले जे चळवळीत आमच्यासह येतील त्यांनाच खरा धोका आहे, असं लक्ष्मणला वाटतं. माझ्यासारखी कामं करणारी अनेक माणसं आज या चळवळीत आहेत; पण दुर्दैवाने त्यांना सक्षम ठेवण्यासाठी पुरेशी ताकद त्यांच्या मागे उभी नाही, याची त्याला खंत वाटते.

‘उपरा’मुळं मराठी साहित्याला लाभलेला हा लेखक. आंबेडकर, फुले, मार्क्स, लोहिया, पीटर्सबर्गचे विचार समजून घेऊन फार वर्षांपूर्वी पुरोगामी चळवळीत सक्रिय सहभागी झालेला हा लक्ष्मण माने. अण्णा भाऊ साठे यांची ‘फकिरा’ आणि प्र. ई. सोनकांबळे यांचं ‘आठवणींचे पक्षी’ ही दोन पुस्तके

त्याला भलतीच प्यारी आहेत. येथील समाजव्यवस्था समजून न घेता बाहेरचं तत्त्वज्ञान आणि चळवळ इथे आणण्याचा प्रयत्न केला, ही विसंगतीही त्याने लक्षात घेतली आहे.

महात्मा फुल्यांचं समग्र साहित्य आजही विद्यापीठांनी अभ्यासक्रमात कुठे स्वीकारलं आहे, असाही प्रश्न त्याला पडतो. सावित्रीबाईंच्या कार्याची चर्चा या वर्षी झाली. त्यापूर्वी सावित्रीबाई यांचा इतिहास माहीत नव्हता का? आपल्याकडे नाही तरी खरा इतिहास कुठं लिहिला जातोय? आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी साऱ्या इतिहासाचं glorification वेगळ्या प्रकारानं करायचं आणि इतिहास इतिहास म्हणून गहिवरायचं! अशा अनेक प्रश्नांनी लक्ष्मणला बोलतं केलं आहे.

शेवटी 'उपरा'च्या अनुषंगाने लक्ष्मण सांगू लागला,

''उपरा'नं माझाच शोध मला लागला. मला कुठे माहीत होतं की मी लिहू शकेन म्हणून. या पुस्तकाला 'फॉर्म'च्या मर्यादा होत्या. प्रामुख्याने माझ्याशी संबंधित असंच मला सांगावं लागलं. नारायण बोडके कॉलेजातली मुलं, यांचं पुढे काय झालं, या सगळ्या कॅरेक्टर्सना न्याय कुठे देता आला? यातली काही कॅरेक्टर्स स्वतंत्र कादंबरीचा विषय आहेत. शशीला तरी कुठे त्यात बोलता आलंय? या सगळ्या माणसांना बोलतं करता आलं तर परिवर्तनाची लढाई अधिक सोपी होणार नाही का?

लक्ष्मणची दोन्ही मुलं झोपली होती. रात्रीचे अकरा वाजत आले होते. सात-आठ तास चाललेल्या एका मैफिलीतून आम्हाला उठावं लागणार होतं. तरीही लक्ष्मणचं बोलणं ऐकत राहावं, असं वाटत होतं.

(– लक्ष्मण माने यांच्या फेसबुक वॉलवरून साभार)

◆

श्र द्धां ज ली

## मुक्तताई टिळक : पक्षनिष्ठेचा आदर्श वस्तुपाठ



भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्या, पुण्याच्या माजी महापौर आणि विधिमंडळातील आमच्या सहकारी मुक्तताई टिळक यांच्या जाण्याने अतिशय दुःख झालं. त्या पक्षाच्या निष्ठावान आणि आदर्श कार्यकर्त्या होत्या. संघटना मजबूत करणे आणि व्यापक जनसंपर्काची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी होती. महापालिकेतल्या गटनेत्या, स्थायी समितीच्या सदस्या अशा जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीरीत्या पार पाडल्या. अडीच वर्षांच्या महापौरपदाच्या कार्यकाळातही आपल्या कार्यकर्तृत्वाच्या बळावर पुणेकरांमध्ये त्या लोकप्रिय झाल्या. कर्करोगाचं निदान झालेलं असतानाही 'कोविड' काळात जनतेच्या सेवेसाठी त्या सतत कार्यमग्न राहिल्या. विधान परिषद निवडणुकीच्या वेळी आजार बळावलेला असतानाही मुंबईत येऊन त्यांनी मतदान केलं, तेव्हा त्यांचा आम्हा सर्वांना अभिमान वाटला.

ताईंची पक्षनिष्ठा आणि समर्पण कार्यकर्त्यांना कायमस्वरूपी ऊर्जा देत राहील. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि या दुःखातून सावरण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना बळ मिळो, ही ईश्वरचरणी प्रार्थना!

**– चंद्रकांतदादा पाटील**

(लेखक भाजपचे ज्येष्ठ नेते, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री आहेत.)

(दै. 'तरुण भारत' मुंबई आवृत्ती मधून साभार)



मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वतीनेही मुक्ता टिळक यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

◆

प्र

का

श


न

## ‘कॉकटेल कार्निव्हल’चे प्रकाशन

‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ प्रकाशित, चेतन जोशी लिखित व मंजिरी धामणकर अनुवादित ‘कॉकटेल कार्निव्हल’ या पुस्तकाचे प्रकाशन १८ डिसेंबर रोजी ज्योत्स्ना भोळे सभागृहात पार पडले.

प्रमुख अतिथी म्हणून सुनंदन लेले यांची उपस्थिती होती. तसेच यावेळेस लेखक चेतन जोशी, अनुवादिका मंजिरी धामणकर हेही उपस्थित होते.

◆






पु

र

स्का

र

## समर्पण

सार्वजनिक वाचनालय, नाशिक तर्फे दिला जाणारा 'अशोक देवदत्त टिळक वाङ्मयीन पुरस्कार' मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित आणि मंजुश्री गोखले लिखित **'समर्पण'** या संत कान्होपात्रा यांच्यावरील चरित्रात्मक कादंबरीला मिळाला. पुरस्काराचे वितरण डिसेंबर महिन्यात झाले. मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे मंजुश्री गोखले यांचे हार्दिक अभिनंदन!

## भारती पांडे

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या वतीने अनुवादासाठी दिला जाणारा **'श्रीपाद जोशी पुरस्कार'** ज्येष्ठ अनुवादिका **भारती पांडे** यांना मिळाला. पुरस्काराचे वितरण सप्टेंबर २०२२ मध्ये झाले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल भारती पांडे यांचे मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे हार्दिक अभिनंदन!



## साहित्य अकादमी पुरस्कार २०२२

साहित्य अकादमी, दिल्ली यांचे सन २०२२चे पुरस्कार २३ भारतीय भाषांमधील सर्वोत्कृष्ट साहित्यकृतींना व अनुवादासाठी १७ भाषांमधील साहित्यकृतींना पुरस्कार जाहीर झाले आहेत.

मराठीमधील पुरस्कार प्रवीण दशरथ बांदेकर यांच्या 'उजव्या सोंडेच्या बाहुल्या' या कादंबरीसाठी व 'इन गुड फेथ' या सबा नक्वी लिखित इंग्रजी पुस्तकाच्या 'सलोख्याचे प्रदेश : शोध सहिष्णू भारताचा' या अनुवादासाठी प्रमोद मुजुमदार यांना जाहीर झाला आहे. ताम्रपट व एक लाख रुपये रोख,असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार विजेत्या लेखकांचे मनस्वी अभिनंदन!

## वाग्यज्ञे साहित्य व कला गौरव पुरस्कार

२२ व्या साहित्यिक कलावंत संमेलनात कवी इंद्रजित भालेराव व अभिनेते प्रसाद ओक यांना **वाग्यज्ञे साहित्य व कला गौरव पुरस्कार** डॉ. वीणा देव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याबद्दल मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मन:पूर्वक अभिनंदनं !

◆

साहित्य वार्ता

## साहित्यिकांचे वर्तनही राजकारण्यांसारखे : विश्वास पाटील


'साहित्यिकांचे वर्तनही हल्ली राजकारणी वागतात, तसे दिसून येते. साहित्य आणि संस्कृतीसाठी हे घातक आहे. सरकार कोणाचेही असले, तरी साहित्य अकादमी ते गावांतील पुरस्कारांबाबतही ही विषमता दिसून येते,' असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील यांनी केले. साहित्यिक-कलावंत प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित २२व्या साहित्यिक-कलावंत संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी, वाचनसंस्कृतीला पाठबळ, ग्रंथालयांना साठ टक्के अनुदानवाढ व महापुरुषांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, साहित्यिकांना प्रोत्साहन देऊन व शिक्षकांच्या मानधनातही भरीव वाढ करून, सरकार संस्कृतीसंवर्धनास चालना देत आहे, असे सांगितले. यावेळी, 'गेल्या तीन दशकांत जाहीर झालेल्या पुरस्कारांची व साहित्यिकांची यादी देणारी श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी,' अशी मागणी विश्वास पाटील यांनी केली. तसेच, 'संमेलनाध्यक्ष होणार नाही, उत्तम साहित्यकृती माझीच, किंवा माझ्या शिष्यांनाच पुरस्कार मिळायला हवा,' अशी काही समीक्षकांची इच्छा असते,' अशी टीकाही यावेळी त्यांनी केली.

'मृत्युंजय' कादंबरीसाठी शिवाजी सावंतांना 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळू नये, ही मोठी खंत आहे. तसेच कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळू नये, यासाठी तजवीज करणारे साहित्यिक नंतर 'जनस्थान पुरस्कार' स्वीकारतात,' हे कटू वास्तवही त्यांनी आपल्या भाषणात बोलून दाखविले. भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, ज्येष्ठ लेखिका संगीता बर्वे, माजी खासदार अशोक मोहोळ, प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप बराटे यावेळी उपस्थित होते.

◆



पुस्तकाच्या पानांतून




# शुभ मंगल

**भा. द. खेर**

*हिंदू-मुस्लीम वैराच्या पार्श्वभूमीवरील प्रेमकहाणी आणि त्या प्रेमकहाणीची पुढील पिढीला मोजावी लागलेली किंमत...*
*दोन हृदयस्पर्शी कादंबऱ्यांचा संग्रह*

प्रायश्चित्त

''मला वाटतं या खेपेस तुम्ही माझ्या काकांना माफ करावं!''

हे शब्द ऐकताच समीरनं आपली मान वळवून बोलणाऱ्या व्यक्तीकडे बघितलं; आणि बोलणारी व्यक्ती ही सुंदर स्त्री आहे, हे बघताच त्याच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. त्याच्या आश्चर्याचं कारण अगदी उघड होतं. पुण्याच्या बकाल वस्तीतील एका मुसलमानी हॉटेलात असलं स्त्रीसौंदर्य बघायला सापडल्यावर कोणाला आश्चर्य वाटणार नाही? त्या हॉटेलमध्ये येण्याची ही त्याची तिसरी खेप होती. साखरेचा



जादा साठा 'काळा बाजार' करण्याची त्या हॉटेल मालकाला एक प्रकारची खोडच लागली होती. त्यामुळे आठ-पंधरा दिवसांनी त्या हॉटेलमध्ये चक्कर मारून साखरेचा साठा तपासण्याचं काम समीरला करावं लागे. त्याच्या कल्पनेप्रमाणे मागच्या दोन्ही खेपेस त्याला त्या ठिकाणी साखरेचा अधिक साठा सापडला होता. तो सापडल्यानंतर त्या हॉटेलवाल्यानं अगदी गयावया केली होती आणि समीरच्या दयाशील वृत्तीचा त्यानं भरपूर फायदा घेतला होता. दुसऱ्या खेपेस हॉटेलचा मालक समीरजवळ दयेची याचना करीत असताना, त्या हॉटेलमधील पलीकडच्या दारावरील पडदा हळूच दूर सारून एका सुंदर स्त्रीनं बाहेर डोकावून बघितल्याचा समीरला भास झाला होता. तिकडे त्याची नजर जाताच तो पडदा पुन्हा दारावर सरकला गेला होता आणि काळ्याकुट्ट मेघातून एखाद्या सौदामिनीनं आपलं सौंदर्य प्रगट करावं, आणि त्या सौंदर्याकडे आपली नजर जाते न जाते तोच तिनं लुप्त होऊन आपलं सौंदर्य अव्यक्त राखावं,असं समीरला त्या वेळी वाटलं होतं. त्या हॉटेलमधून बाहेर पडताना तो मनाशी म्हणाला होता-'छे! असल्या घाणेरड्या हॉटेलमध्ये असलं सौंदर्य कधी असणंच शक्य नाही.' त्यानंतर त्या प्रकारावर त्यानं कधी विचारही केला नव्हता. इतकंच नव्हे, तर त्या गोष्टीची त्याला पुढे स्मृतीही राहिली नव्हती. परंतु आता तोच पडदा दूर सारला गेला होता आणि त्याच दारात एक अत्यंत सुंदर तरुणी उभी राहून त्याला म्हणत होती,''मला वाटतं, तुम्ही या खेपेस माझ्या काकांना माफ करावं!''

तिच्याकडे बेफिकिरीनं बघत त्याला म्हणावंसं वाटलं, 'तुला खूप वाटतं की तुझ्या काकांना मी माफ करावं! परंतु पुनःपुन्हा माफ करण्याच्या लायकीचे तुझे काका थोडेच आहेत? आणि त्यांच्यासाठी तुझी रदबदली हवी कशाला?'

हे शब्द मनाशी उच्चारीत समीर त्या स्त्रीकडे बघत असतानाच ती त्याला पुन्हा म्हणाली, ''खरंच, या खेपेस तरी तुम्ही आमच्या काकांना सूट द्या.''

हे ऐकल्यानंतर समीरनं आपली दृष्टी तिच्यावरून काढून काकांकडे लावली आणि तिला उत्तर दिलं,''तुमच्या काकांची जादा साखर ठेवण्याची ही तिसरी खेप आहे. किती वेळा त्यांना सूट द्यायची?''

यावर आपल्या पुतणीच्या बोलण्याची मुळीच वाट न बघता कादरभाई म्हणाला,''अल्लाची शपथ घेऊन सांगतो, की मी पुन्हा असं कधी करणार नाही; पण या खेपेस मला सोडा.''

''अल्लाची शपथ घेऊन तुम्ही त्याला मात्र कमीपणा आणत आहात!''

या समीरच्या बोलण्यावर कादरभाईंनी आपला हात आळीपाळीनं आपल्या दोन्ही गालांवर मारून घेतला आणि म्हटलं,''तोबा तोबा! या अल्ला! या खुदा! पुन्हा असं केलं तर हातकड्या अडकवा!''

मागच्या वेळी त्याच्याकडून दयेची याचना करताना त्यांनी हेच शब्द उच्चारले होते. या गोष्टीचं समीरला स्मरण होऊन तो म्हणाला, ''पुन्हा कशाला? आताच अडकवतो की हातकड्या!''

आपला चेहरा शक्य तितका भीतियुक्त  करून कादरभाईंनी आपल्या पुतणीकडे दीन मुद्रेनं बघितलं आणि म्हटलं, ''शिरीन, तूच सांग आता यांना काही तरी!''

शिरीन समीरकडे बघत म्हणाली, ''यापुढे काका असलं काही करणार नाहीत, याची मी हमी देते; मग तर झालं ना? ही शेवटची खेप समजा आणि त्यांना सूट द्या!''

कादरभाईंना या खेपेस माफ करायचं त्यानं मघाशीच ठरवलं होतं. कारण शिरीनसारखा जामीन ताबडतोब पटणं मुळीच अवघड नव्हतं. परंतु एखाद्या नाठाळ कुळाच्या जामिनाला पुनःपुन्हा बजावून सांगणाऱ्या एखाद्या न्यायाधीशाचा आव आणून समीर शिरीनकडे बघत म्हणाला,''तुमच्या काकांची हमी घेण्यापूर्वी तुम्ही नीट विचार करा बरं!''

शिरीननं यावर काहीच उत्तर दिलं नाही; परंतु आपले काळेभोर डोळे तिनं समीरच्या नजरेला लावले आणि ती अशा काही अभिप्रायानं हसली, की जणू काय तिला म्हणायचं होतं,'हो, हो, मला चांगली जाणीव आहे त्याची!'

तिच्या या हसण्याला हसून प्रत्युत्तर देण्याचा मोह समीरला आवरता आला नाही.

तो जायला उठला तेव्हा कादरभाई त्याला म्हणाला,''वा साहेब! असं कसं होईल? चहा घेतल्याशिवाय मी तुम्हाला बरा जाऊ देईन!''

या बोलण्यावर समीर काही बोलण्यापूर्वीच शिरीन आपल्या काकांना उद्देशून म्हणाली, ''काका, चहा माझ्याच खोलीत पाठवा. आम्ही एकत्र बसून चहा घेतो.''

या तिच्या बोलण्याचं मनाशी आश्यर्च करीत असतानाच ती त्याला म्हणाली, ''चला, आपण माझ्या खोलीत बसू आणि त्या ठिकाणी चहा घेऊ.''

आपलं ऑफिस संपल्यानंतर संध्याकाळी या हॉटेलमध्ये प्रवेश केल्यापासून

समीरला आश्चर्याचे एकामागून एक धक्के बसत होते. असल्या घाणरेड्या हॉटेलमध्ये असं सौंदर्य बघायला सापडल्यावर त्याला आश्चर्याचा पहिला धक्का बसला होता. शिरीनच्या वरील धीट बोलण्यानं त्या आश्चर्यात भर पडली होती; आणि तिच्या खोलीत प्रवेश केल्यानंतर त्यानं ज्या ज्या गोष्टी बघितल्या आणि ऐकल्या त्या बघून व ऐकून त्याचं आश्चर्य पराकोटीला पोचलं होतं.

शिरीनची खोली जरी आधुनिक तऱ्हेनं शृंगारलेली होती तरी तिच्या खोलीत आश्चर्य वाटण्याजोग्या बऱ्याच गोष्टी होत्या. समीरच्या नजरेतून त्या सुटल्या नाहीत. खोलीत प्रवेश केल्याबरोबर कोणालाही समोरच्या भिंतीवर चटकन दिसेल असं 'अकबर बादशहा'चं भव्य छायाचित्र टांगलेलं होतं. त्याच्या शेजारीच आपल्या सहकाऱ्यांसह एका उमद्या घोड्यावर बसून चौफेर नजर फेकीत चाललेल्या 'शिवाजी महाराजां'चा फोटो लावण्यात आला होता. या गोष्टीचं आश्चर्य समीरच्या मनात स्थिर होतं न होतं, तोच उजव्या बाजूच्या भिंतीवर 'स्वामी विवेकानंदां'चा फोटो त्याला दिसला. लगेच त्याची नजर त्या फोटोखाली लिहिलेल्या 'रामसभा में हरिजन बैठ। कोन बडा कोन छोटा है ।' या अक्षरांवर स्थिर झाली. त्याच्या शेजारीच खेटून 'महात्मा गांधीं 'चा भव्य फोटो त्यानं बघितला, तेव्हा त्याला किंचित हसू आलं.

त्याच्या हसण्याचा अभिप्राय ओळखूनच की काय शिरीन त्याला म्हणाली, ''मला माहीत आहे तुम्ही का हसता ते!'' आणि समीरला पुढे बोलण्याचा मुळीच अवसर न देता, तिनं आपल्या खोलीतील भिंतीवरच्या साऱ्या फोटोंवर नजर फिरवीत म्हटलं,''माझ्या या फोटोबद्दल तुम्ही बहुधा हसत असाल! परंतु मी ते उगाच टांगलेले नाहीत!''

इतकं बोलून ती थांबली आणि समीरला म्हणाली, ''अरेच्चा! तुम्ही उभे का राहिलात? बसा ना!''

असं म्हणून समीरला बसण्यासाठी तिनं एका कोचाकडे अंगुलीनिर्देश केला. त्या ठिकाणी तो बसल्यानंतर तिनं आपलं बोलणं पुढे चालू केलं. मघाशी थांबलेला विषय पुन्हा चालू करण्याच्या इराद्यानं तिनं म्हटलं, ''मी जातीनं मुसलमान आहे म्हणून 'अकबर बादशहा', 'महंमद पैगंबर' या लोकांविषयी मला अभिमान वाटणं साहाजिक आहे. इंग्रजांचा वकील व्यापाराची सनद मागण्यासाठी मोंगल दरबारी आला, तेव्हा त्यानं मोंगल बादशहाला सात वेळा लवून कुर्निसात केला; त्याच मोगल कुळातील आमचा 'अकबर बादशहा' आहे, ही गोष्ट मी ज्याप्रमाणे विसरले नाही, त्याचप्रमाणे तुमच्या 'शिवाजी'नं

इंग्रजांची कपटनीती वेळीच ओळखून त्यांची सुरतेची वखार लुटली, याही गोष्टीचं मला विस्मरण झालेलं नाही. 'महंमद पैगंबरा'नं आमच्या धर्माची प्रस्थापना केली म्हणून तो जितका मोठा, तितकाच जगाला 'रामसभा में हरिजन बैठे, कोन बडा कोन छोटा है?' याप्रमाणे समतेचं उदात्त तत्त्व सांगणारे 'स्वामी विवेकानंद'ही थोर मानायला नको का?''

तिच्या या प्रश्नाला त्याला चटकन उत्तर देता आलं नाही. एका यवन तरुणीच्या तोंडातून असलं अस्खलित तत्त्वज्ञान बाहेर पडेल,याची त्या हॉटेलमध्ये शिरताना त्याला कल्पनाही नव्हती. त्याला आपल्या आईचे उद्‌गार आठवले. त्याची आई त्याला नेहमी म्हणत असे, 'समीर, काही झालं तरी या मुसलमानांवर कधी विश्वास ठेवू नकोस. ते कितीही गोड बोलले तरी अखेरीस आपला गळा कापल्याशिवाय राहणार नाहीत.'

शिरीन बोलत असताना तो तिच्याकडे अगदी निरखून बघत होता. तिचं मुग्ध सौंदर्य तिच्या निष्पाप अंतःकरणाचीच साक्ष देत आहे, असं त्याला वाटलं. आणि तिचे प्रगल्भ विचार ऐकून तर त्याची तशी खात्रीच पटली; परंतु आपल्या बोलण्याच्या अखेरीस तिनं जेव्हा त्याला वरीलप्रमाणे प्रश्न विचारला, तेव्हा त्याला आपल्या मातेच्या उद्‌गारांची आठवण झाली आणि तो गोंधळून म्हणाला,

''अजून मी त्या प्रश्नावर फारसा विचारच केलेला नाही.''

ही कबुली देताना त्याला कमीपणा वाटला. त्यानं त्या प्रश्नावर विचार केला नव्हता असं नाही. तर तिनं त्या प्रश्नाचा ज्या तऱ्हेनं विचार केला होता, तसा त्यानं केला नव्हता. आपल्या बालपणापासून आपल्या मातेचे वरीलप्रमाणे विचार त्यानं ऐकले होते. मुसलमानांबद्दल तिला एवढा तिरस्कार का वाटावा, ही गोष्ट त्याला ठाऊक नव्हती. आणि तिनंही त्याचं कारण त्याला कधी सांगितलं नव्हतं. परंतु एखाद्याला बाळकडू द्यावं त्याप्रमाणे मुसलमान जातीबद्दल तिरस्कार करण्याचं तिनं त्याला शिकवलं होतं; आणि ती शिकवण त्यानं बिनतक्रार मान्य केली होती. कारण त्याचं आपल्या आईवर मनस्वी प्रेम होतं. तेव्हा वरीलप्रमाणे कबुली देण्यात जरी त्याला कमीपणा वाटला,तरी ती कबुली देऊन आपण एकीकडून आपल्या मातेबद्दलचं प्रेम व्यक्त करीत आहोत, याबद्दल मनातल्या मनात त्याला समाधान झालं.


◆

## नवी संहिता... नवा आशय...

# माझा आनंद

## प्रसाद ओक

‘धर्मवीर’ साकारताना अभिनेते प्रसाद ओक
यांना गवसलेला अद्‌भुत आनंद...





**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# अ-अमिताभचा


## जी. बी. देशमुख

महानायक अमिताभ बच्चनच्या
सुवर्णमहोत्सवी कारकिर्दीतील बासष्ट
भूमिकांचे खुमासदार चर्वण




**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तकाच्या पानांतून




# निर्जन पूल

**कोंडापल्ली कोटेश्वराम्मा**

अनुवाद
**शर्मिला इनामदार**

*कम्युनिस्ट चळवळीच्या विघटनात होरपळलेल्या कार्यकर्तीचं ९२व्या वर्षी लिहिलेलं तटस्थ आत्मकथन*

## वंचितांमधून एक आवाज

**गीता रामस्वामी**

‘हैदराबाद बुक ट्रस्ट’ने सप्टेंबर २०१२ मध्ये कोंडापल्ली कोटेश्वराम्मांचे ‘निर्जन वारधी’ आत्मवृत्त प्रकाशित केले. ह्या पुस्तकाला इतका प्रचंड प्रतिसाद मिळेल,अशी कल्पना आम्ही स्वप्नातही केली नव्हती. ह्या पुस्तकाबद्दल एक उत्सुकता असेल, असे मात्र नक्की वाटले होते. त्यामागे एक सबळ कारणही आहे. ते कारण म्हणजे ‘कोटेश्वराम्मा’ या दिवंगत ‘सीतारामय्यां’च्या पत्नी आहेत. अशा माणसाच्या पत्नी, की ज्याने भारत सरकारला सर्वांत मोठा धोका असणारा आणि समाजमनावर दूरगामी परिणाम करणारा



‘पीपल्स वॉर ग्रूप’ स्थापन केला. परंतु ‘सीतारामय्यां’चा विषय पुस्तकात अगदी कडेकडेनेच येतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या प्रतिसादाचा या गोष्टीशी फारच थोडा संबंध आहे, असे म्हणता येईल. एका आठवड्यात दुसरी प्रत काढावी लागली आणि दोन महिन्यांच्या आत दुसरी आवृत्ती निघाली. वाचकांच्या प्रतिक्रियांचा पाऊस पडला. काही जण फोनवरून बोलले, काही जणांनी पत्र लिहून आपली प्रतिक्रिया कळवली. मागील ३० वर्षांत आम्ही जवळजवळ ४०० पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. ह्यातील बरीचशी पुस्तके स्त्रियांनी लिहिलेली आहेत, काही स्त्रियांविषयी आहेत, तर काही पुस्तके स्पष्टपणे स्त्रीवादी आहेत. ह्या पुस्तकांना पुरुषांकडून मिळालेला प्रतिसाद अगदीच थंड होता. असे वाटावे की, जणू काही ह्या पुस्तकांमधील विषयांशी त्यांचा काहीही संबंध नाही आणि त्यांच्या जगाशी सूतराम संबंध नसलेल्या एका वेगळ्याच विश्वाबद्दल ही पुस्तके आहेत. ‘निर्जन वारधी’ ने मात्र आमचा हा अनुभव खोटा ठरवला. हे पुस्तक वाचताना आम्ही कितीतरी वेळा रडलो, असे सांगणाऱ्या अनेक पुरुषांचे फोनवर फोन आले. त्यापैकी कित्येकांना ‘कोटेश्वराम्मां’ना प्रत्यक्ष भेटण्याची इच्छा होती. एक सुप्रसिद्ध पत्रकार तर १२ तासांचा प्रवास करून ‘विशाखापट्टणम’ला जाऊन त्यांना भेटले. कर्नाटकमधील ‘तुंगभद्रा प्रकल्पा’मध्ये काम करणाऱ्या एका इंजिनिअरने केवळ अश्रूंपुरतेच न थांबता, हे पुस्तक ‘कन्नड’मध्ये भाषांतरित करायचे ठरवले.जगाच्या वेगवेगळ्या टोकांहून तीन पुरुष वाचकांनी ह्या पुस्तकाच्या प्रत्येकी १०० प्रती विकत घेतल्या आणि आपापल्या ठिकाणच्या सार्वजनिक वाचनालयांना भेट देऊ केल्या, मित्रमंडळींत आणि परिचितांमध्ये वाटल्या. एकाने मला लिहिले,

ह्या पुस्तकातील काही प्रसंग वाचताना माझ्या डोळ्यांत पाणी आलं. त्यांचं आयुष्य काय आहे बघा - आधी बालविधवा, मग एका ध्येयवादी क्रांतिकारी तरुणाशी लग्न, स्वातंत्र्यलढ्यात सहभाग, त्यानंतर दुसऱ्या स्त्रीसाठी पतीने सोडून देण्याचा महादुर्धर प्रसंग, मातृत्वदेखील असं की दोन्ही मुलांच्या वियोगाचं सतत जाळणारे दु:ख. त्यांच्या कहाणीत सहनशीलता, संघर्ष, शोकांतिका, दु:ख तर ठायीठायी दिसतं आणि त्याच वेळी बरोबरीने आदर्शवाद, त्याग, धैर्य, नि:स्वार्थ दानशूरता, चिकाटी, सयंम, आशा आणि प्रेरणा या साऱ्यांचा एक अद्‌भुत मिलाफदेखील दिसतो. ही स्त्री कशानेही मोडून पडली

नाही. कितीतरी वेळा ती खचली; पण पुन:पुन्हा; तिने स्वत:ला गोळा करून उभं केलं आणि ती पुढे जात राहिली. म्हणतात ना... कठीण परिस्थिती टिकत नाही, पण भक्कम माणसं टिकतात!

आपल्या समाजात स्त्रीची ओळख बऱ्याचदा कुठल्या न कुठल्या पुरुषाच्या संदर्भाने केली जाते. 'कोटेश्वराम्मा'देखील, सीतारामय्यांनी त्यांना सोडून दिले असले तरी, त्यांच्या पत्नी म्हणूनच ओळखल्या जातात. मात्र स्वत:च्या आठवणी लिहून 'कोटेश्वराम्मां'नी त्यांच्या आयुष्याल्या,भावभावनांना आणि स्वत:ला स्वतंत्र ओळख प्राप्त करून घेतली आहे. प्रेयसीसाठी नवऱ्याने सोडून दिलेली बायको, वडिलांकडे जाण्यासाठी मुलांनी नाकारलेली आई, एक दु:खी स्त्री अशी ही ओळख नाही;तर याउलट आत्मसन्मान आणि धैर्य याचे मूर्तिमंत रूप असणारी एक तेजस्वी स्त्री, जीवघेण्या संघर्षातही तगून राहण्याची क्षमता असणारी अत्यंत ताकदीची स्त्री, अशा स्वरूपांत त्या आपल्यासमोर येतात.

'कोटेश्वराम्मां'चा जन्म १९२० मध्ये आंध्रप्रदेशात कृष्णा नदीच्या सुपीक खोऱ्यामधील एका गावात श्रीमंत शेतकरी असलेल्या 'रेड्डी कुटुंबा'मध्ये झाला. त्या अगदी ४-५ वर्षांच्या असतानाच त्यांच्या मामाबरोबर त्यांचा विवाह झाला. एक-दोन वर्षांतच त्यांच्या नवऱ्याचे निधन झाले. अशा प्रकारे त्या 'बालविधवा' झाल्या. परंतु अत्यंत प्रेमळ कुटुंबामध्ये त्यांचे संगोपन झाल्याने बरीच वर्षे त्यांना या गोष्टींची जाणीव नव्हती. त्या शाळेत जात होत्या आणि स्वातंत्र्य आंदोलनाने भारलेल्या त्या दिवसांत त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. त्यांची आई चरख्यावर सूत कातत असे आणि त्यांच्या नातेवाइकांपैकी काही लोकांनी शिक्षण सोडून स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली होती. निव्वळ १० वर्षांच्या असतानाच 'कोटेश्वराम्मां'नी स्वत: गांधीजींना पाहिले होते. इतर काही स्त्रियांप्रमाणेच त्यांनीही आपले दागिने गांधीजींना देऊन टाकले होते.

अत्यंत महत्त्वाच्या कालखंडामध्ये त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. देशभर पसरू लागलेल्या स्वातंत्र्य आंदोलनासमोर बरीच आव्हाने होती. वेगवेगळ्या चळवळींमध्ये असणारे विचारधारेचे फरक आणि धोरणाचे प्रश्न होते. यामध्ये कम्युनिस्ट आंदोलन, समाज प्रबोधनाच्या चळवळी आणि अगदी नुकतेच बाळसे धरू लागलेले दलित आंदोलनही सामील होते. सध्याचे आंध्रप्रदेश (AP) आणि तेलंगणा राज्य त्या काळात नव्हते. पूर्वी हैदराबादच्या निजामाकडून ब्रिटिशांनी घेतलेले समुद्रकिनाऱ्यावरील 'जिल्हे' आणि दक्षिणेकडील 'रयालसीमा'

हे प्रांत 'मद्रास रेसिडेन्सी'मध्ये होते. या भागाचा कारभार मद्रास शहरामधूनच नियंत्रित होत असे. १८५२ मध्ये बांधलेले 'कॉटन धरण' (आताचे-'गोदावरी धरण') आणि संपूर्ण खोऱ्यात बांधलेले बांधांचे जाळे यामुळे हा भाग समृद्ध झाला. पूर्वेकडील भाग, तेलंगणा, हा निजामशाहीच्या हद्दीत होता.आंध्र म्हणजे ज्याला पूर्वी 'सर्कार जिल्हे' म्हणून ओळखत असत, तो भाग आणि तेलंगणा यांचा चेहरामोहरा एकमेकांपासून फार वेगळा होता.आंध्रकडील भागात ब्रिटिश सरकारमुळे आणि विशेषत: 'ख्रिश्चन मिशनरी'जच्या कामामुळे इंग्रजी माध्यमातून पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीचा खूप विकास झालेला होता. पत्रकारितेमध्ये चांगली वाढ होत होती. पहिले तेलुगू पत्रक 'सत्यदूत' १८३३ मध्ये सुरू झाले. त्या पाठोपाठ इतरही बरीच मासिके सुरू झाली.'मासुलीपट्टणम्', 'राजमुंद्री','काकीनाडा' आणि 'विजयवाडा' यांसारख्या मध्यवर्ती शहरांतून अनेक 'साहित्यसंघ' उदयाला आले. त्यांची विविध प्रकाशने होती,आणि हे 'साहित्यसंघ' भरपूर वेगवेगळे कार्यक्रमही आयोजित करत असत.याच कालावधित अनेक सामाजिक सुधारणांच्या चळवळींनी ह्या भागातील उच्चवर्णीयांना आपल्या कवेत घेतले होते. 'विरेशलिंगम्' यांनी बालविधवा पुनर्विवाहासाठी आणि मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. गुर्जाडा अप्पाराव यांचे प्रत्ययकारी मूलभूत लेखन या कामासाठी त्यांचा आधारस्तंभच होते.'सर्कार प्रांता'मधील ही सामाजिक सुधारणेची चळवळ पुढे जाऊन हळूहळू स्वातंत्र्य आंदोलनाच्या मुख्य प्रवाहात मिसळली.

या मुख्य राष्ट्रवादी चळवळीने पट्टाभी सीतारामय्या, टंगुटूरी प्रकाशम् आणि सरोजिनी नायडू यांसारखे प्रभावी नेते निर्माण केले होते. त्या बरोबरीनेच १९३० ते १९३२ मध्ये काँग्रेसमधील मूलगामी विचार करणारे लोक इतर पर्यायांचा शोध घेत होते. याच सुमारास आंध्रातील समुद्रकिनारपट्टीच्या भागात कम्युनिझमची बीजे रोवली जात होती. 'कोटेश्वराम्मां'च्या आयुष्याची पार्श्वभूमी कम्युनिस्ट आंदोलनाने आणि पार्टीने व्यापलेली आहे. शिक्षणावर तिलांजली वाहून स्वांतत्र्य आंदोलनात सहभागी झालेले आंध्रातील विद्यार्थी काँग्रेसमधील मूलगामी विचारसरणीच्या लोकांनाही भेटू लागले आणि समाजवादी साहित्य विचाराचा अभ्यास करू लागले. १९३१ साल सुरू होईपर्यंत चंद्रा राजेश्वरा राव, नंडूरी प्रसाद राव, तुम्मला वेंकटरामय्या हे लोक बनारस हिंदू विद्यापीठात दाखल झालेले होते. त्यांनी 'यंग कम्युनिस्ट लीग'मध्ये काम करायला

सुरुवात केलेली होती. १९३४ पर्यंत अमीर हैदर खान आणि इतर काही जणांनी मद्रासमध्ये 'कम्युनिस्ट पार्टी ' च्या शाखा सुरू केल्या होत्या. सुंदरय्या आणि अजून काही जण १९३२ मध्येच 'कम्युनिस्ट पार्टी 'चे सभासद झालेले होते. सप्टेंबर १९३४ मध्ये 'विजयवाडा'मध्ये वेगवेगळ्या जिल्ह्यांतील कम्युनिस्ट प्रतिनिधींची बैठक होऊन 'आंध्र कार्यकारी संघटक समिती'ची स्थापना झाली. तेव्हाच आंध्रप्रदेशमधील 'कम्युनिस्ट पार्टी 'ची स्थापना झाली,असे मानले जाते. जवळजवळ लगेचच पार्टीवर बंदी घालण्यात आली आणि त्यानंतर भूमिगत राहूनच पार्टी कार्यरत होती. १९४२ मध्ये नाझींनी 'सोव्हिएट रशिया'वर केलेल्या हल्ल्याचा पार्टीने निषेध केला आणि युद्धाला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. तेव्हा ब्रिटिश सरकारने पार्टीवरील बंदी उठवली.

'कोटेश्वराम्मां'च्या कुटुंबीयांनी आणि कम्युनिस्टांनी १९३९ मध्ये 'सीतारामय्यां'बरोबर त्यांचे दुसरे लग्न ठरवले. त्यावेळी 'सीतारामय्या' पार्टीचे कार्यकर्ते होतेच. त्यामुळे या लग्नाने 'कोटेश्वराम्मां'ची जन्मगाठ कायमची कम्युनिस्ट आंदोलनाबरोबर बांधली गेली. पतीचा भक्कम पाठिंबा असल्यामुळे त्यांनी पार्टीच्या कार्यकर्त्या म्हणून काम करायला सुरुवात केली. आपल्या दोन मुलांच्या संगोपनाखेरीज त्या 'महिला संघा'च्या कार्यक्रमांमधून आणि मोर्चांमधून भाग घेऊ लागल्या. पार्टीची वैचारिक पत्रके, लेख आदी लेखनकामाच्या आवृत्या काढून गावोगावी पोचवण्याच्या कामात त्या सहभागी झाल्या. याशिवाय पार्टीच्या सांस्कृतिक आघाडीच्या त्या कृतिशील सदस्या होत्या. पुढे 'सीतारामय्या' 'कम्युनिस्ट पार्टी' च्या 'कृष्णा जिल्ह्या'तील शाखेचे सेक्रेटरी झाले. हा जिल्हा आंध्रप्रदेशातील 'कम्युनिस्ट राजकारणा'चा बालेकिल्ला होता. त्यामुळे ह्या पदाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले होते. १९४६ ते १९५१ मध्ये पार्टीवरील निर्बंधांचे प्रमाण वाढल्यावर 'कोटेश्वराम्मा'देखील इतरांप्रमाणेच ५ वर्षे भूमिगत झाल्या. या कालावधित तेलंगणातील शेतकरी आंदोलनाने चांगलाच जोम धरला होता.

१९४० च्या उत्तरार्धात हैदराबाद राज्यात बदलाचे वारे झंझावाती वेगाने वाहत होते. हिंदू आणि मुसलमान अशा दोन सांप्रदायिक ताकदींमध्ये राज्य विभागले जात होते आणि सरकारसमोर पेचप्रसंग तयार झाला होता. संपूर्ण भारत देश स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झालेला होता; पण हैदराबाद मात्र स्वायत्ततेची आस बाळगून होते. या अस्थिरतेच्या वातावरणात जमीनदारांच्या

जाचाला कंटाळलेल्या मध्यम व गरीब शेतकऱ्यांना संघटित करणे कम्युनिस्टांना शक्य झाले. १९४८ ते १९५१ मधील 'तेलंगणा आंदोलन' म्हणजे हैदराबादच्या निजामाने चालवलेल्या जुलमी जमीनदारी पद्धतीच्या विरोधात शेतकऱ्यांनी केलेला सशस्त्र उठाव होता. हा उठाव कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली झालेला होता. उठावाची सुरुवात १९४६ साली 'नालगोंडा' जिल्ह्यात झाली आणि लवकरच त्याचे लोण संपूर्ण तेलंगणामध्ये जवळजवळ ४०० गावांमधून पसरले. शेतकऱ्यांनी आणि मजुरांनी संपूर्ण गावावर निरंकुश सत्ता गाजवणाऱ्या स्थानिक जमीनदारांविरुद्ध म्हणजे जहागीरदार, देशमुख इत्यादींविरुद्ध बंड केले. कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाने अदमासे ३००० गावांना जमीनदारांच्या पाशातून वाचविण्यात यश मिळवले. भूमिहीन शेतकऱ्यांना १०हजार एकर जमिनीचे वाटप झाले. जमीनदारांच्या खासगी सैनिकांशी लढताना जवळजवळ ४,००० शेतकऱ्यांना या संघर्षात प्राण गमवावे लागले. १९४८ मध्ये भारतीय सैन्याने ताबा घेतल्यानंतर हैदराबाद राज्य अधिकृतरित्या भारतीय संघात सामील झाले. 'कम्युनिस्ट पार्टी 'मधील बरेच पुरुष आंध्र आणि तेलंगणा या दोन्ही प्रदेशांमधून ये-जा करू शकत होते. पण तेलंगणाच्या समुद्रकिनाऱ्यावरील दलांमधून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या आणि स्त्रियांच्या हालचालींवर बरेचसे निर्बंध लागू होते. ते आपापल्या जागीच अडकून पडले होते.

१९५१ मध्ये सशस्त्र उठाव मागे घेतला गेला आणि पार्टीचे भवितव्य अधांतरी दिसू लागले. उठाव मागे घेण्याच्या सुमारास पार्टीमधील मतभेद वाढीस लागले होते आणि पार्टीच्या एकसंघतेला तडे पडू लागले होते. पार्टीने मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांची संख्या कमी करायचे ठरविले आणि बऱ्याच पूर्णवेळ कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करून आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठी पाठवून दिले.

मूलगामी चळवळीत सक्रिय सहभागी असलेले कार्यकर्ते काही ना काही कारणाने या सक्रिय आयुष्यापासून लांब जातात,तेव्हा त्यांना एका प्रचंड मोठ्या पोकळीला तोंड द्यावे लागते. ही एक फारशी पुढे न येणारी बाजू आहे. या कार्यकर्त्यांमध्ये विमनस्कता आणि नैराश्य मोठ्या प्रमाणावर आढळते. पार्टीतील आयुष्य सोडून दिल्यानंतर ते त्यांच्या गतआयुष्याकडेही परतू शकत नाहीत, आणि बऱ्याचदा त्यांच्या कुटुंबीयांनाही हे लोक नकोसे झालेले असतात. बाहेरच्या जगात लागणाऱ्या औपचरिक शिक्षणाअभावी आणि बाहेरील

कामांच्या अनुभवाच्या कमतरतेपोटी ते नोकरीच्या बाजारातही कुचकामी ठरतात. शिवाय क्रांतिकारी चळवळीचे वलय त्यांच्या नावाशी कायम जोडलेले असतेच. त्यामुळे कुटुंबासाठी सातत्याने रोजगार कमावून आणणारा भरवशाचा माणूस, असे आपले स्थान ते बनवू शकत नाहीत. त्यांचे व्यक्तिगत वर्तुळदेखील पार्टी आणि चळवळीतील लोक यांपुरतेच मर्यादित असते. त्यांचा सर्व मित्रपरिवार तिथेच असतो. हे सर्व सोडून ते बाहेर पडतात, तेव्हा बाहेरच्या जगात त्यांचे दु:ख, यातना समजून घेणारी माणसे जेमतेम हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच नगण्य असतात. बदलासाठी अविरत संघर्ष करत राहणे, लोकांना संघटित करणे, इतरांचा सहानुभूतीपूर्वक विचार करणे, नि:स्वार्थ वृत्ती, अशी आत्तापर्यंत जिवापाड जपलेली मूल्ये आता कुचकामी ठरतात. बाहेरच्या जगातील चंगळवाद आणि पैसाकेंद्रित व्यापारी मनोवृत्ती त्यांच्या पचनी पडत नाही. अशा प्रकारच्या असंख्य अडचणी त्यांच्या पुढे आ वासून उभ्या असतात. त्यांना गरज असते वेळेची आणि थोड्या अवकाशाची. काळानुसार त्यांचे घाव भरून येतात. आजूबाजूच्या बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी स्वत:ची तयारी करण्याची संधी त्यांना या अवकाशात मिळते. आसपासच्या जगात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आपले वैयक्तिक योगदान देण्याची आणि इतरांना छोट्याछोट्या गोष्टींतून मदत करण्याची मानसिकता हळूहळू ते विकसित करू शकतात.ही एक अत्यंत प्रगाढ, वेदनादायी प्रक्रिया आहे आणि त्याबद्दल फारच थोडे लिहिले गेले आहे. नेमके ह्याचेच प्रत्ययकारी चित्र आपल्याला 'कोटेश्वरम्मां'च्या अबोल लेखनात दिसेल.

चळवळीची पिछेहाट होते, तेव्हा विशेषत: क्रांतिकारी स्त्रियांना फार मोठ्या गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागते. चळवळीमधील त्यांचे आयुष्य आणि बाहेरच्या जगातील त्यांचे आयुष्य, यांत लक्षणीय फरक दिसून येतो. चळवळीशी जोडल्यानंतर तेथील जीवनपद्धतीतील बदल आत्मसात करून घेण्यात आणि नव्या आकांक्षांशी आपले नाते जोडण्यात या स्त्रिया पूर्णपणे गुंतलेल्या असतात. हे सर्व नंतर सोडून देणे सोपे नसते. दूरदृष्टीने विचार केला, तर कदाचित हा बदल त्यांच्या दूरगामी हितासाठी फायद्याचाच ठरत असेल, पण तरीदेखील हा प्रवास प्रचंड ताणतणावाने आणि दु:खाने भरलेला असतो. 'कोटेश्वराम्मा' स्वत: १९४० पासून कम्युनिस्ट चळवळीत काम करत होत्या. थोडीथोडकी नव्हे, तर पूर्ण पाच वर्षे त्या आपल्या जन्मगावापासून,

आपल्या कुटुंबातील माणसांपासून, एवढंच नव्हे तर खुद्द, स्वत:च्या मुलांपासून दूर, अज्ञातवासात राहिल्या. या दीर्घ कालावधिनंतर आंध्रप्रदेशात आपल्या परिवारात आणि समाजात परत आल्यावर त्यांनाही अशा प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागला. वर सांगितल्याप्रमाणे चळवळीतील माजी कार्यकर्त्याला सोसावा लागणारा त्रास तर त्यांना भोगवा लागलाच, शिवाय नवऱ्याने सोडून दिल्याचा आघात, त्यांतील प्राणांतिक वेदना आणि त्यानंतरचे मानहानीने भरलेल्या आयुष्याचे 'हलाहल' हे सारे त्यांना देखील पचवावे लागले. मुलांच्या वियोगाची भयंकर नामुष्कीही सोसावी लागली. आर्थिक विवंचना जोडीला होतीच. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले, तर त्यांच्यावर आभाळच कोसळले होते.

'कोंडापल्ली सीतारामय्यां'चा एका दुसऱ्या स्त्रीशी विशेष संपर्क होता. या स्त्रीचा उल्लेख 'कोटेश्वराम्मां'च्या लेखनात 'ती स्त्री' असा येतो. 'सीतारामय्यां'च्या या संपर्काची परिणती अखेरीस स्वत:च्या पत्नीला सोडून देण्यामध्ये झाली. कम्युनिस्टांच्या सांस्कृतिक आघाडीमध्ये 'कोटेश्वराम्मां'नी भाग घ्यावा म्हणून एकेकाळी उपोषणाला बसलेला त्यांचा नवरा आता त्यांच्या विरुद्ध गेलेला होता. मुक्त लैंगिक संबंध, विवाहबाह्य संबंध, हे चित्र सामान्यपणे बऱ्याच कम्युनिस्ट नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या आयुष्यात दिसून येते. संपूर्ण समाजातील एकूण परिस्थितीचे हे एक खेदजनक प्रतिबिंब आहे. परंतु या घटनेकडे 'कोटेश्वराम्मां'नी काणाडोळा करायला दिलेला नकार, ही यांतील असामान्य बाब आहे. इथे त्यांनी एक अत्यंत जबाबदार आणि डोळस भूमिका घेतलेली आहे. आपल्या लेखनामध्ये त्यांनी 'सीतारामय्यां' ना एका राक्षसाचे रूप दिलेले नाही किंवा त्यांच्या निष्ठूर वर्तनाचे वर्णनही केलेले नाही. तरीदेखील 'कोटेश्वराम्मां'नी केलेली घटनांची उजळणी आणि त्यांच्या कहाणीतील मूक जागा वाचकाला काय झाले असेल, याची कल्पना देतात. 'सीतारामय्यां'चं एक वाक्य त्या सांगतात, 'एकेकाळी तू विधवा होतीस; तरीदेखील तुझ्याशी लग्न करून मी तुला समाजात एक स्थान प्राप्त करून दिलेलं आहे,' या त्यांच्या बोलण्यावर 'कोटेश्वराम्मां'ची प्रतिक्रिया फक्त एवढीच आहे, की 'ते शब्द मला खूप लागले.' इतर लोकांनीही त्यांना खूप नावे ठेवली, त्यांचा अपमान केला. त्यावर त्या म्हणतात, ''काही लोकांच्या दृष्टीने मी अगदी वाया गेलेली बाई होते. आपलंचं म्हणणं खरं सिद्ध करण्यासाठी हे लोक मुलांसाठी

वाट्टेल ते सहन करत नवऱ्याबरोबर राहणाऱ्या बायकांची उदाहरणं मला देत असत. मला वाटतं की,कसलेच प्रश्न नसणाऱ्या लोकांना अडचणीत असलेली माणसं म्हणजे बहुधा त्यांचं हक्काचं मनोरंजनाचं साधन वाटत असावं.'' या प्रकारची वाईट वागणूक नवऱ्याकडून आणि समाजाकडून मिळून देखील त्याविषयीचा कोणताच कडवटपणा त्यांच्या आवाजात वा लेखनात कुठेही जाणवत नाही.

१९५७ मध्ये, वरकरणी पाहता विवाहबाह्य संबंधांमुळे, पण त्याहीपेक्षा कदाचित पार्टीअंतर्गत राजकारणामुळे 'सीतारामय्या' पार्टीतून निलंबित झाले. तेलंगणातील एक प्रमुख शहर-वरंगळ इथे ते त्यानंतर राहायला गेले. सक्रिय राजकारणापासून काही काळ ते लांब राहिले. १९६० मध्ये 'कोटेश्वराम्मां'नी हळूहळू पुन्हा आपले आयुष्य शून्यापासून उभारण्याचे खडतर काम हाती घेतले. दुर्गाबाई देशमुख यांनी निराधार स्त्रियांसाठी चालविलेल्या वसतिगृहात पुढची पाच वर्षे राहून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. हा परिस्थितीने केलेला फार मोठा उपहासच म्हणावा लागेल.

या काळात कार्यकर्त्यांची संख्या कमी झाल्याने 'कम्युनिस्ट पार्टी ' कमजोर झाली होती. १९६२ मधील भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवर पार्टीमधील मतभेद अजून वाढू लागले आणि अखेरीस १९६४ मध्ये पार्टीचे दोन गटांत विभाजन झाले - भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप - CPI) आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप - CPMd). १९६७ च्या निवडणुकांमध्ये दोन्ही पक्षांनी मिळून फक्त २० जागा जिंकल्या. सत्ताधारी पक्षाचा प्रमुख विरोधी पक्ष ही पार्टीची ओळखदेखील पुसून गेली. आंध्रप्रदेशामधून त्यांना अक्षरश: नष्ट करण्यात आले होते. पक्षात बहुसंख्येने असणारे उच्चवर्णीय 'कम्मा जाती'चे लोक मोठ्या प्रमाणात सोडून गेले आणि पक्षाचे लढाऊ सैनिक म्हणून ओळखले जाणारे अनुसूचित जातीतील जवळजवळ सगळेच लोक काँग्रेसकडे वळले.

१९६७ मधील नक्षलबारीची ज्वाला आणि १९६९ मधील 'श्रीकाकाकुलम्'मध्ये झालेला शेतकऱ्यांचा उठाव या दोन्ही गोष्टीदेखील कम्युनिस्टांना त्यांचे मूळचे स्थान परत देऊ शकल्या नाहीत. निवडणुकीमधील डाव्यांचे स्थान अजूनच डळमळीत झाले. याच सुमारास CPM मधील काही कार्यकर्त्यांना घेऊन चारू मुजुमदारने एक नवीन ग्रूप तयार केला. आंध्रप्रदेशात या ग्रूपचे नेते

'सीतारामय्या' होते; पण ती एक अजूनच वेगळी व स्वतंत्र कथा आहे.

या कालखंडाबद्दल 'कोटेश्वराम्मा' तपशिलात लिहितात, कारण हाच कालखंड त्यांची जीवघेणी परीक्षा घेणारा सर्वांत कठीण काळ होता. दोन्ही मुले त्यांना दुरावली-मुलाचा खून झाला आणि नवऱ्याच्या आकस्मिक निधनाने मुलीने खचून आत्महत्या केली. थोड्याच दिवसांत आयुष्यभर त्यांच्या पाठीशी कायम उभी राहणारी त्यांची आईदेखील निवर्तली. त्यांचा आधारस्तंभच हरवला... 'कोटेश्वराम्मा' लिहितात -

'जिने माझं लग्न लावून दिलं, ती माझी आई आता या जगात नाही. या लग्नातून जन्माला आलेली मुलंही वारली. असं वाटतं की, हे लग्न म्हणजे निव्वळ आभासच होता... माझं आयुष्य म्हणजे खरंच स्वप्न आहे का? की नुसती केवळ अश्रूंची एक धारा आहे? हे व्याकूळ हृदय उराशी घेऊन मी कशी जगू?-मला प्रश्न पडायचा.'

आयुष्याच्या सरत्या दिवसांत 'कोटेश्वराम्मां'च्या आईची जगण्याची इच्छा पूर्णपणे संपली होती. त्याविषयी 'कोटेश्वराम्मा' लिहितात -

*'काहीही खायला दिलं तरी ती एकच गोष्ट म्हणत राहायची- 'मला काही नको. मला फक्त करुणाच्या आधी मरण येऊ दे. आयुष्यभर तुझे दुःखाचे डोंगर बघून मी आता थकले. आता अजून काही बघायची माझ्यात ताकद नाही.'' मी तिला म्हणत असे, तू सुद्धा माझ्याकडे पाठ फिरवलीस तर माझे अश्रू कोण पुसणार? त्यावर तिचं उत्तर असे - तुझा जन्मच मुळी आयुष्यभर अश्रू गाळण्यासाठी झाला आहे की काय, कोण जाणे!'*

स्वतःच्या कुटुंबाची पडझड पाहण्याखेरीज त्यांना 'कम्युनिस्ट पक्षा'ची पडझडही जवळून पाहावी लागली. त्याचा त्यांना खूप खोलवर त्रास झाला.

'माझ्या मते एकच पार्टी आहे - कम्युनिस्ट पार्टी. पार्टीचे CPI आणि CPM मध्ये तुकडे झाल्यानंतर देखील मी दोन्हीकडे माझं नोंदणी शुल्क पाठवत असे. पुढे सुंदरय्यांनी मला हे थांबवण्याचा सल्ला दिला. पार्टीची नुसती सभासद फी देण्यापेक्षा पार्टीची सदस्य म्हणून समाजात प्रत्यक्ष काम केलेलं चांगलं, असं त्यांचं म्हणणं होतं. 'कम्युनिस्ट पार्टी 'चे आता सात तुकडे झाले होते. आम्हा सर्वांच्या मनातली समतेची समाजव्यवस्था या सात तुकड्यांपैकी नेमकं कोण आणणार आहे? प्रत्येक मे-दिनाला ते घोषणा देतात -जगातल्या कामगारांनो,एक व्हा!,पण आम्ही स्वतः कधीही एकत्र येत नाही.

आम्ही आमच्यातच भांडत बसतो, मग कामगार तरी कसे एकत्र येणार आणि क्रांती तरी कोण आणणार?

*मला शक्य असतील त्या गोष्टी करत मी चालत राहिले. जिवंत राहून तरी मी असं काय मिळवणार आहे? असं एकदा माझ्या तोंडून निघाल्यावर सुंदरय्या म्हणाले होते, तू देशाची सेवा केलीस किंवा नाही केलीस, तरी एक गोष्ट नक्की आहे. तू देशाचं नुकसान कधीच करणार नाहीस. अशाही लोकांची सध्या फार गरज आहे.'*

दरम्यान १९९१ पर्यंत 'सीतारामय्या' थकले होते आणि जोडीला प्रकृतिस्वास्थ्यही गमावून बसलेले होते. अशा वेळी स्वत:च स्थापन केलेल्या, त्यांच्या स्वत:च्याच पार्टीतून त्यांची हकालपट्टी झालेली होती. त्यांना 'कोटेश्वराम्मां'ना भेटण्याची इच्छा होती. यापूर्वीही त्यांनी बऱ्याचदा अशी इच्छा मित्रमंडळींपाशी बोलून दाखविली होती. या वेळी तरी कोटेश्वराम्मांनी त्यांना भेटावे, असा या मित्रमंडळींचा तीव्र आग्रह होता.

'मी त्या सर्वांना सांगितलं, त्यांना मला भेटावंसं वाटतंय, एवढं पुरेसं आहे का? मलाही त्यांना भेटण्याची इच्छा असायला हवी ना? मला तसं वाटत नाही; म्हणून मी भेटणार नाही.

परंतु अगदी भावासारख्या असणाऱ्या माझ्या तीन जवळच्या लोकांनी माझी समजूत घातली आणि ते मला 'सीतारामय्यां'कडे घेऊन गेले. मला पाहता क्षणीच ते रडायला लागले. ''आता तुम्ही कशासाठी अश्रू गाळताय? वर्षानुवर्षं तुमच्यासाठी, तुमच्या मुलांसाठी, तुमच्या आधारासाठी, पोटापाण्यासाठी, घरासाठी रडूनरडून माझे डोळे कोरडे पडलेत, आणि अजून तुमच्या डोळ्यांतून अश्रू येऊ शकतात?!'' माझे हे शब्द ऐकल्यावर ते हमसाहमशी रडायला लागले. त्यांना असे रडताना पाहून माझ्या डोळ्यांतूनही अश्रू वाहू लागले.

त्यांना माझ्याबरोबर राहण्याची इच्छा होती; पण कुणीही ह्या गोष्टीचा उल्लेख केला, की मी तो विषय उडवून लावायचे. मित्र म्हणून त्यांचा स्वीकार करणं आणि त्यांच्याबरोबर राहणं, या दोन सर्वस्वी वेगवेगळ्या गोष्टी होत्या.'

या ठिकाणी वाचक विचारात पडल्याशिवाय राहत नाही. या दोघांपैकी कुणाचे आयुष्य जास्त दु:खद होते, असा प्रश्न पडतो. हजारो माओवाद्यांचे प्रेरणास्थान असणारा हा महान नेता एका बाजूला आहे. आयुष्याच्या संध्याकाळी सर्वस्वाची होळी करून, स्वत:च स्थापन केलेल्या पार्टीतून हकालपट्टीच्या

मानहानीचे दु:ख त्याला सोसावे लागले आहे. दुसऱ्या बाजूला त्याने नाकारलेली स्त्री आहे. आयुष्यभर सर्वांकडून अवहेलनेचे दु:ख तिने भोगले आहे, पण तरीदेखील इतक्या प्रतिकूल परिस्थितीत ती शेवटपर्यंत ताठ मानेने उभी आहे. या दोन्हीमध्ये कुणाचे दु:ख मोठे आहे?

'कोटेश्वराम्मां'नी एका हॉस्टेलच्या वॉर्डन म्हणून नोकरी स्वीकारली. तिथे शिकणाऱ्या अनेक तरुण मुलींना त्यांनी मार्गदर्शन केले. आजही या मुली त्यांची अत्यंत प्रेमाने आठवण काढतात. निवृत्त झाल्यानंतर देखील त्यांनी अजून एका हॉस्टेलमध्ये आपले काम चालू ठेवले. १९९९ मध्ये वयाच्या तब्बल ७९व्या वर्षी त्यांनी वृद्धाश्रमात राहाण्याचा निर्णय घेतला. हा वृद्धाश्रमदेखील CPI ने निवृत्त कॉम्रेड्ससाठी चालू केलेला होता. तिथेही त्यांनी इतरांची काळजी घेण्याचे काम शेवटपर्यंत केले.

'पूर्वी मी विद्यार्थ्यांना सांभाळलं होतं, तर आता इथे वयस्कर मंडळी होती. ज्यांना नीट दिसत नाही, त्यांना मी बातम्या वाचून दाखवत असे. ज्यांना जेवणघरापर्यंत चालत येणं शक्य व्हायचं नाही, त्यांना मी कॉफी वगैरे नेऊन देत असे. बागकामात देखील मी मदत करत असे. अशा प्रकारची जमतील ती छोटीछोटी कामं मी करत होते.'

'सीतारामय्यां'चे निधन झाल्यानंतर 'कोटेश्वराम्मां'च्या मनात विचारांचे थैमान सुरू झाले.

'सीतारामय्यां'चा देह बघितल्यावर माझ्या मनात असंख्य विचारांचा कल्लोळ उठला. त्यांच्या आयुष्यातली कितीतरी वर्षं त्यांनी लोकांसाठी आणि चळवळीसाठी दिली. ८० वर्षांच्या उभ्या आयुष्यात ६० वर्षं ते क्रांतिकारी म्हणून जगले. तुरुंगात किंवा हद्दपार नसतानाचं जेमतेम २० वर्षांचं सामान्य आयुष्य त्यांच्या वाट्याला आलं असेल. मग असं असूनही, त्यांच्या पार्टीचा एकही माणूस त्यांना भेटायला कसा आला नाही? त्यांचे एकमेकांत मतभेद होते म्हणून पार्टीने त्यांना टाकून देण्याची काय गरज होती? मी त्यांच्या विचाराची नाही, म्हणून फार पूर्वीच 'सीतारामय्यां'नी मला सोडून दिलं होतं. आता पार्टीच्या कॉम्रेड्सनी त्यांना सोडून दिलं. आयुष्य म्हणजे काय एवढंच आहे?'

'कोटेश्वराम्मां'च्या समकालीन अशा कितीतरी सक्रिय स्त्रियांच्या आयुष्याचा इथे विचार करता येईल, उदा. इंदिरा गांधी, लक्ष्मी सेहगल, कल्पना जोशी, कमलादेवी चट्टोपाध्याय, दुर्गाबाई देशमुख इ. 'कोटेश्वराम्मां'प्रमाणेच १२

वर्षांच्या ‘दुर्गाबाईंनी’देखील आपल्या सोन्याच्या बांगड्या गांधीजींना देऊन टाकल्या होत्या. या सगळ्याच जणी श्रीमंत आणि प्रतिष्ठित घरांतील मुली होत्या. परंतु ‘कोटेश्वराम्मा’ वगळता त्या सर्व मुख्य प्रवाहातील राष्ट्रीय चळवळीत सहभागी होत्या. त्यामुळे नवीन राष्ट्र उभारणीच्या कामामध्ये त्यांना पुढे बऱ्याच संधी मिळाल्या. ‘कोटेश्वराम्मां’चे आयुष्य मात्र या सर्वांच्या एकदम विरुद्ध होते. त्यांच्या श्रीमंत आई-वडिलांना आपल्या संपत्तीचा बराच मोठा हिस्सा गमवावा लागला. शिवाय त्यांनी ‘कम्युनिस्ट आंदोलना’त भाग घ्यायला सुरुवात केल्याने त्यांचे आयुष्य अजूनच खडतर बनले. तरीदेखील त्यांनी शेवटपर्यंत अगदी मनापासून कम्युनिस्ट विचारांची साथ कायम ठेवली. ‘कोटेश्वराम्मां’च्या आई मृत्यूशय्येवर असताना जे बोलल्या, त्यावरून याचा अंदाज येऊ शकतो.

‘माझ्या मृत्यूनंतर मला कुठल्याही धार्मिक प्रथांचं अवडंबर नको. तुझ्या पार्टीतल्या पद्धतीप्रमाणे स्मृतिसभेत माझी आठवण ठेव. दोन्ही पार्टीतल्या लोकांना माझा निरोप दे. म्हणावं, तुम्ही सर्वांनी एकत्र काम करावं, अशी ‘अंजम्मा’ची इच्छा होती. मी २हजार रुपयांची रक्कम वेमुरी नागेश्वर रावकडे वेगळी ठेवली आहे. त्याच्याकडून ती घेऊन दोन्ही पार्टींमध्ये समसमान देऊन टाक.’

‘कोटेश्वराम्मां’च्या लेखनातून आपल्याला चळवळीतील चढ-उतार आणि यामध्ये सामान्य कार्यकर्त्यांच्या समोर येणाऱ्या अडचणी, याची कल्पना येते. त्यामुळे हा एक महत्त्वाचा दस्तावेज ठरतो. विस्मरणात गेलेल्या विश्वातील त्या काळचे कम्युनिस्ट आजच्या वेगवान, संपूर्णपणे व्यापारीकरण झालेल्या जगात स्वप्नवत वाटतात. ‘कोटेश्वराम्मा’ आपल्याला त्यांची बलस्थाने आणि उणिवा दोन्ही दाखवतात.

‘कोटेश्वराम्मां’नी ‘निर्जन वारधी’ (निर्जन पूल) हे नाव आपल्या ह्या ‘जीवन कहाणी’ला द्यायचे कसे काय ठरविले? त्यांची एक मैत्रीण म्हणते, ‘‘कोटेश्वराम्माने मागची पिढीदेखील पाहिलेली आहे, आणि नंतरची पिढीही पाहिलेली आहे. या दोन्ही पिढ्यांमधील ती एक ‘पूल’ आहे. या ‘पुला’वरून अनेक लोक चालले आणि दोन्ही दिशांनी पांगले. आता तिथे कोणीच नाही. हा ‘पूल’ मात्र आता एकाकी राहिला आहे.’’

*‘माझ्याबरोबरचे सारेजण या जगातून निघून गेलेत, मी एकटीच मागे*

*राहिलेय.*


तरी देखील माझं एकटेपण एखाद्या कोपऱ्यात पडून राहायला तयार नाही. एखादी दु:खद गोष्ट ऐकली, की ते 'गोदावरी नदी'सारखा विलाप करतं. आपल्या क्रांतिकारी भूतकाळाची आठवण काढून हळवं होतं. भूतकाळातले आमचे आदर्श येणाऱ्या पिढ्यांसाठी राखू पाहतं. आत्ताच्या पिढीने आमचा इतिहास जाणावा म्हणून आमच्या भूतकाळाविषयी लिहिताना ते समाधान पावतं.'

*अशी आहे माझ्या आयुष्याची चित्तरकथा- दु:खाने भरलेली. माझ्या आठवणींतून निघाली आणि 'निर्जन पूल' बनली. ही कथा आहे, 'कोंडापल्ली कोटेश्वराम्मा'ची... (कुटुंबाचं आडनाव अजूनही तेच आहे)'*

कुठलाही विखार मनात न बाळगता 'कोटेश्वरांम्मा' कसे काय लिहू शकल्या? अनेक वर्षे अनुभवलेले एकाकीपण हे यामागील एक कारण असू शकते. या अनुभवांतून आयुष्याशी मेळ जोडणे, त्यांना शक्य झाले असावे. १९५० च्या सुरुवातीला 'सीतारामय्या' त्यांना सोडून गेल्यानंतर एक दीर्घ कालावधी त्यांनी सर्वस्वी एकट्याने काढला आहे. या काळात एकट्याने, कम्युनिस्ट छत्राशिवाय आत्मसन्मानाने जीवन जगणे त्यांनी आत्मसात केले. १९८० च्या सुरुवातीला हैदराबादमधील स्त्री-शक्ती संघटनेने तेलंगणातील सशस्त्र उठावात आणि त्या वेळच्या कम्युनिस्ट आंदोलनात भाग घेतलेल्या स्त्रियांच्या मुलाखती घेण्याची एक योजना हातात घेतली. यांतूनच पुढे 'आम्ही इतिहास घडविला' (We Were Making History) हे पुस्तक तयार झाले. 'कोटेश्वराम्मां'ची मुलाखतदेखील ह्या पुस्तकात होती. ह्या पुस्तकाच्या अनुषंगाने त्याही प्रसिद्धीच्या झोतात आल्या. त्या वेळी सार्वजनिक कामाच्या बैठकांना हजेरी लावणे, बैठकांमधून वक्ता म्हणून बोलणे अशा प्रकारच्या कार्यक्रमांत त्या सहभागी होऊ लागल्या. यापाठोपाठ पुन्हा एक २०१० पर्यंतचा मोठा कालावधी आत्मचिंतनात गेला आणि त्यानंतर त्यांनी हे 'आत्मकथन' लिहायला घेतले. कदाचित एकांताचा हा एवढा मोठा कालावधीच त्यांच्या मनावरचे घाव भरून येण्यासाठी आणि त्यांना मानसिक स्थैर्य देण्यासाठी उपकारक ठरला असावा.

◆

**पुस्तकाच्या पानांतून**




# फेलानी

## अरूपा पतंगिया कलिता

अनुवाद

**मेघना ढोके**

*'फेलानी' म्हणजे फेकून दिलेली...*
*आसामच्या भूमितील वांशिक चळवळीत होरपळून गेलेल्या 'फेलानी'ची अस्वस्थ करणारी जीवनगाथा.*

'फेलानी'ही आसाममधल्या सत्य घटनांवर आधारित गोष्ट. ईशान्य भारतातल्या या राज्यानं घुसखोरी, आंदोलनं, हिंसाचार, जातीय-वांशिक तेढ आणि त्यांतून निर्माण झालेले संघर्ष आणि सामान्यांच्या रक्ताचा पडलेला सडा हे सारं सोसलं. १९७० चे दशक सरता सरता सुरू झालेला हा संघर्ष अजूनही धगधगतोच आहे. हे पुस्तक त्या संघर्षाचा मानवी पट मांडते. धगधगतं आसाम आंदोलन, घुसखोर हटाव म्हणून जोर धरलेल्या मागणीने उसळलेला आक्रोश आणि पुढे ते आंदोलन शमल्यावर आसामच्याच विविध जनजातींमध्ये पेटलेल्या संघर्षाचं भीषण आणि भयंकर चित्र या पुस्तकातून वाचकांसमोर उभं राहतं. त्या संघर्षात सामान्य जिवांचं काय झालं, याची ही चित्तरकथा.



'आसू' अर्थात 'ऑल आसाम स्टुडण्ट्स युनियन' यांच्या नेतृत्वाखाली १९७९ मध्ये 'आसाम आंदोलना'ला सुरुवात झाली. आंदोलनाचे नेते आणि भारत सरकार यांच्यामध्ये करार होऊन १९८५ मध्ये आंदोलन संपलं. तोच अत्यंत गाजलेला 'आसाम करार' आंदोलन संपल्यानंतर 'आसू'चे दोन नेते प्रफुल्ल महंत आणि बृगू फुकन यांनी राजकीय पक्षाची स्थापना केली. पुढे या पक्षाने 'आसाम'मध्ये निवडणुका लढवल्या आणि ते सत्तेतही आले.१९८५-१९९० आणि १९९६ ते २००१ या काळात 'आसाम' मध्ये त्यांची सत्ता होती.

योगायोगाने या आंदोलनासोबतच 'आसाम'मध्येच एका सशस्त्र संघटनेचा उदय झाला. 'उल्फा'! 'युनायटेड लिबरेशन फ्रण्ट ऑफ आसाम.'त्याच काळात अजून एक संघटना जन्माला आली. 'अब्सू!' 'ऑल बोडो स्टुडण्ट्स युनियन.' 'बोडो आंदोलन'ही उभे राहिले आणि त्यांनी स्वतंत्र बोडोलॅण्डची, स्वतंत्र राज्याची मागणी केली. त्यातूनही 'बोडो-बगैर बोडो' यांच्यात हिंसाचार उफाळला आणि संघर्ष पेटला. हिंसाचाराच्या घटनांत बळी पडले ते मुख्यत्वे बंगाली हिंदू आणि बंगाली मुस्लीम! त्यांच्या गावांवर हल्ले झाले, घरं पेटवून देण्यात आली, गुरं पळवण्यात आली. धान्यांच्या गुदामांना आगी लावण्यात आल्या. त्यांच्या संसाराची राखरांगोळी झाली.'आसामी हिंदू' आणि 'बोडो गटा'त मारामाऱ्या, संघर्ष पेटले. जंगल-जमिनींचे जुने दावे निकालीच काढू म्हणत त्यांनी परस्परांवर हल्ले केले. या साऱ्यांत बळी पडलेल्यांचा आकडा मोठा होता, कित्येक माणसं मेली. दंगलीनंतरही बऱ्याच दिवसांनी जाळलेल्या घरांत,डोंगरदऱ्यांत,जंगलात प्रेतं सापडत होती.

स्थलांतरित बंगाली कुटुंबांतील शेकडो माणसं मारली गेली. मात्र या साऱ्यांत सर्वाधिक सोसलं, सहन केलं ते बायकांनीच! भयंकर आयुष्य त्यांच्या वाट्याला आलं. बायका, मुलं आणि म्हातारी माणसं होरपळून निघाली. घरांतली तरणीताठी माणसं जिवाच्या भीतीनं जंगलात लपून बसत; पण घरात मागे राहिलेल्या आपल्या बायका-पोरांचं, म्हाताऱ्या आई-बापाचं काय झालं, हे कुणाला कळतही नसे. कुठूनही भयंकर हल्ला होत असे, कोण लोक कुठून येतात, आपल्यावर का हल्ला करतात? हे बायका-पोरांना कळण्यापलीकडचं होतं. जीव वाचवणंही शक्य नव्हतं, कसेबसे अनेकजण जीव वाचवत पळाले. शेकडो कुटुंबे रस्त्यावर आली, बायका-पोरांना 'रिलीफ कॅम्प'मध्ये आसरा

घ्यावा लागला. त्यांचं पुर्नवसन सुरू व्हायलाही कित्येक महिने जावे लागले.

हे पुस्तक 'आसाम'च्या या घटनांकडे समकालीन इतिहास म्हणून पाहते. एका महिलेच्या आयुष्याचा माग काढत काढत हा प्रवास सुरू होतो.'फेलानी!' तिचा नवरा दंगलीत मारला गेला, पोटातला गर्भ पोटातच मेला आणि आपलं घर डोळ्यासमोर पेटलेलं तिला पाहावं लागलं. रक्तामांसाचा चिखल तुडवत कशीबशी ती आपल्या मुलासह जीव वाचवत पळाली.

अशा कित्येक कहाण्या.'आसाम'मधल्याच ढेमाजी,कोक्राझार यांसह अनेक भागांत भयंकर रक्तपात,दंगली झाल्या त्या सर्वाधिक बाधित भागातच.असे भोग कित्येकांच्या वाट्याला आले.अलीकडेच एक अहवाल प्रसिद्ध झाला. 'बेअरिंग विटनेस : अ रिपोर्ट ऑन द इम्पॅक्ट ऑफ व्हायलन्स ऑन वुमेन इन नागालॅण्ड ॲण्ड आसाम,'असे त्या अहवालाचे नाव.'नागालॅण्ड'आणि 'आसाम'मधल्या संघर्षात बळी पडलेल्या अनेकांच्या कहाण्या तो अहवाल सांगतो. 'फेलानी'च्या या गोष्टीत त्या कहाण्यांचेच प्रतिबिंब सापडते. 'शुभन मोंडोल'सारख्या अनेक महिलांनी याच अहवालात आपल्या कहाण्या सांगितल्या आहेत. ढेमजी, कोक्राझार या आसामी जिल्ह्यांत त्याकाळी राजकीय-वांशिक संघर्षांत बायकांनी सोसलेलं भयंकर जगणं वाचून पोटात गोळा येतो. अरूपा पतंगिया कलिता यांचं हे पुस्तक त्यासंदर्भातही पथदर्शी ठरावं असंच!

◆

## नवी संहिता... नवा आशय...


# मोहनस्वामी

**वसुधेंद्र**

अनुवाद

**डॉ. डी. व्ही. अरवंदेकर**

जगाच्या अव्हेरलेपणानं आयुष्यभर भळभळणाऱ्या जखमा वाहणाऱ्या समलिंगी जोडप्यांच्या अंतर्मुख करणाऱ्या कथा...




**किंमत : ३३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


# दि व्हॉल्ट ऑफ विष्णू

**अश्विन सांघी**

अनुवाद


**संकेत लाड**

मिथक कथा, इतिहास आणि समकालीन वास्तवाला समांतर कथात्म बांधणीत अलवार गुंफणाऱ्या अश्विन सांघी यांची 'भारत मालिके'तील दमदार कादंबरी...




**किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तकाच्या पानांतून




# छोटा देश

**गाएल फाई**

अनुवाद

**आकांक्षा आठल्ये**

*जहाल-मवाळ गटांतील राजकारण आणि सीमावादात होरपळणाऱ्या किशोराची अंतर्मुख करणारी कथा.*

या गोष्टीची सुरुवात कशी झाली, हे मला खरंच ठाऊक नाही.

तरी त्या दिवशी, त्या छोट्या व्हॅनमध्ये असताना बाबांनी आम्हाला सगळं नीट समजावून सांगितलं होतं.

‘‘हे बघा,बुरुंडीला रवांडासारखंच असतं.तिथे तीन वेगवेगळे गट आहेत.त्यांना ‘जमात’ म्हणतात. संख्येने सगळ्यांत जास्त असणारे हुतू, ते बुटके असतात आणि त्यांचं नाक मोठं असतं.’’

‘‘म्हणजे डोनासीएनसारखे?’’ मी विचारलं होतं.

‘‘नाही, तो झैरियन आहे, तो वेगळा! तुला उदाहरणच द्यायचं झालं तर आपला स्वयंपाकी, प्रोथेसारखे. त्यानंतर अजून एक जमात म्हणजे त्वा, बुटके लोक. खरं म्हणजे त्यांची संख्या



अगदी नगण्य आहे, त्यांना जमेत न धरण्याइतकी कमी, आणि तिसरी म्हणजे तुत्सी जमात; म्हणजे तुझी आई ज्या जमातीची आहे ती! हे लोक हुतूंपेक्षा संख्येने खूप कमी आहेत.उंच, सडपातळ आणि छोटं नाकवाले आणि या लोकांच्या डोक्यात नक्की काय चालू असतं, ते काही कोणी सांगू शकत नाही.'' मग माझ्याकडे बोट दाखवत बाबा म्हणाले होते, ''गाब्रिएल, तू अगदी खराखुरा तुत्सी आहेस, तू काय विचार करतोस ते काही कोणाला कळू शकत नाही.''

खरं तर माझे विचार मला स्वतःलाही कळायचे नाहीत.तसंही या सगळ्यांबद्दल आपण विचार तरी काय करणार? म्हणून मग मी विचारलं,''तुत्सी आणि हुतू या दोन जमातीं एकाच प्रांतातल्या नाहीत, म्हणून त्यांचं आपापसांत भांडण आहे का?''

''नाही, तसं नाही, ते एकाच देशातले आहेत.''

''मग... त्यांची भाषा भिन्न आहे का?''

''तसंही नाही, ते दोघं एकच भाषा बोलतात.''

''मग, त्यांचा देव वेगवेगळा आहे का?''

''नाही ना, त्यांचा देवसुद्धा एकच आहे.''

''मग... त्यांचं भांडण आहे तरी कशावरून?''

''कारण त्यांचं नाक एकसारखं नाही.''

आमची चर्चा तिथेच थांबली. जरा विचित्रच होतं हे सगळं. मला वाटतं की, बाबांना सुद्धा यांतलं फार काही नीटसं समजलं नव्हतं. त्या दिवसापासून मी रस्त्याने चालताना लोकांचं नाक आणि त्यांची उंची बघू लागलो. गावात खरेदीसाठी गेलो असताना मी आणि माझी धाकटी बहीण-ॲना आम्ही दोघे हळूच कोण 'हुतू 'आहे आणि कोण 'तुत्सी' हे ओळखण्याचा प्रयत्न करायचो. आम्ही कुजबुजायचो-

''तो पांढरी पॅन्ट घातलेला आहे ना, तो 'हुतू' आहे; तो बुटका आहे आणि त्याचं नाक मोठं आहे.''

''हं! आणि तो बघ तिकडे, टोपी घातलेला, केवढा उंच आणि सडपातळ आहे आणि त्याचं नाकही एकदम सरळ आहे, तो 'तुत्सी' आहे.''

''आणि तो, तिकडे चट्टेरी-पट्टेरी शर्टवाला,तो 'हुतू' आहे.''

''नाही नाही, नीट बघ ना! तो उंच आणि सडपातळ आहे.''

''हो; पण त्याचं नाक मोठं आहे!''

आणि तिथे या जमातींच्या बाबतीत आमच्या मनांत घोळ सुरू झाला. तसंही बाबांना आम्ही याबद्दल बोललेलं आवडत नसे. त्यांच्या मते, लहान मुलांनी राजकारणात लक्ष घालू नये; पण आमच्याकडे दुसरा पर्यायच नव्हता. आजूबाजूचं वातावरण दिवसेंदिवस जास्तच विचित्र होत होतं. शाळेतसुद्धा मित्रामित्रांमध्ये 'हुतू' आणि 'तुत्सी' या विषयावरून वादविवाद, भांडणं होत होती. एकदा शाळेत 'सिरानो द बेरजेराक' हा चित्रपट बघत असताना एक विद्यार्थी म्हणाला होता,

''तो बघा, त्याचं नाक बघा; तो 'तुत्सी' आहे.''

एकूणात काय, तर वातावरण बदललं होतं. कोणाचं नाक कसंही असलं तरी प्रत्येकाला हा बदल जाणवत होता.

परत जाण्याच्या विचारांनी मला झपाटून टाकलं आहे. मला माझ्या देशाची आठवण येत नाही, असा एकही दिवस जात नाही. लहानपणीच्या आठवणी जागृत करण्यासाठी एखादा बारीकसा आवाज, एखादा मंद सुवास, दुपारच्या वेळचं ऊन, कुठलासा हावभाव, तर कधीकधी शांततासुद्धा पुरेशी असते.

''भुतं आणि विनाशाचे ढीग यांखेरीज तुला तिथे दुसरं काही सापडणार नाही,'' ॲना मला वारंवार सांगत आहे. तिला त्या 'शापित देशाचं' नावसुद्धा परत कधी ऐकायचं नाहीये. मी तिचं ऐकतो, माझा तिच्यावर विश्वास आहे. ती माझ्यापेक्षा नेहमीच जास्त वास्तववादी होती. म्हणूनच मी माझ्या डोक्यातून ही कल्पना काढून टाकतो. परत कधीही तिकडे जायचं नाही, असं मी कायमचं ठरवतो. माझं आयुष्य आता इथे आहे,फ्रान्समध्ये.

खरंतर आता मी ना तिकडचा राहिलोय आणि ना धड इकडचा! एखाद्या ठिकाणी राहणं म्हणजे तिथल्या भौगोलिक रचनेमध्ये, तिथल्या वातावरणाच्या कुशीत विरघळून जाणं. इथे तसं काहीच घडलं नाही. मी फक्त एका प्रवाहात आहे. मी इथे राहतो, झोपतो आणि दिनचर्येचा भाग म्हणून काही गोष्टी करतो. माझं शहर म्हणजे एक वसतिगृह आणि व्यावहारिक सोय आहे. माझ्या घराला नवीन रंगाचा आणि जमिनीवर अंथरण्याच्या नवीन कॅनव्हासच्या कापडाचा वास येतो. माझे शेजारी माझ्यासाठी पूर्णपणे अनोळखी आहेत; जिन्याच्या पायऱ्यांवर आम्ही एकमेकांना सोईस्कररीत्या टाळतो.

मी पॅरिसमध्ये राहतो आणि काम करतो. सेंट-क्वेन्टीन ऑन -इवलीन. आरइआर लाइन सी. कुठलाही भूतकाळ नसलेलं एक नवं शहर. इथे मला रुळायला म्हणजे नोकरीचं स्थैर्य, घर, छंद, मित्र परिवार सर्व जमून यायला काही वर्षं लागली.

इंटरनेटवर नवीन लोकांना भेटायला मला आवडतं. एखादी संध्याकाळ किंवा काही आठवडे चालणारी गोष्ट. माझ्याबरोबर फिरणाऱ्या सगळ्या मुली अगदी वेगळ्या आहेत, एकाहून एक सुंदर! त्या स्वतःबद्दल बोलतात ते ऐकताना, त्यांच्या केसांचा सुगंध अनुभवताना मी झिंगून जातो, आणि त्यांच्या कापसासारख्या मुलायम बाहुपाशांमध्ये, त्यांच्या मांड्यांमध्ये आणि त्यांच्या शरीरामध्ये स्वतःला झोकून देतो. त्यांच्यापैकी एकही मुलगी मला तो जीवघेणा प्रश्न विचारायला कधीही विसरत नाही, तेही पहिल्याच भेटीत. ''तू मूळचा कुठला आहेस?'' अगदी नेहमीचा, पारंपरिक प्रश्न! नातं पुढं जाण्यासाठीचा अपरिहार्य भाग. अनेकदा माझ्या त्वचेचा तपकिरी रंग माझ्या वंशाचा दाखला देत माझ्या अस्तित्वाची ओळख पटवून देतो. मी माणूस आहे. माझं उत्तर काही त्यांना आवडत नाही; पण ना माझा हेतू त्यांना चिडवण्याचा असतो, ना कोणी ज्ञानी वा तत्त्वज्ञ असल्याचा आव आणण्याचा. मी अगदी लहान असतानाच ठरवलं होतं, की स्वतःला कधीच कोणत्या व्याख्येत बसवायचं नाही.

संध्याकाळ सरत जाते. माझं कौशल्य कामी येतं आणि त्या बोलू लागतात. मी लक्ष देऊन ऐकतो ही गोष्ट त्यांना आवडते. मीही त्यांच्या गोष्टींमध्ये भिजून जातो, बुडून जातो. मी दारूच्या नशेत खोल, खोल बुडत माझ्या साधेपणाला दूर सारतो. मग मी एक तरबेज शिकारी बनून त्यांना हसवतो, त्यांना उद्युक्त करतो. थोडी मजा यावी, म्हणून मूळ वंशाविषयीचा मुद्दा पुनःपुन्हा उकरून काढतो. त्याबद्दलचं रहस्य जाणूनबुजून जागृत ठेवतो. काही काळ आम्ही असा उंदीर-मांजराचा खेळ खेळत राहतो, आणि मग माझं अस्तित्व कसं अनेक मृतदेहांचं ओझं वाहत आहे, असं कोरडं विक्षिप्त उत्तर देतो. त्यांना काहीच समजत नाही. त्यांना काहीतरी हलकंफुलकं हवं असतं. त्या हरिणीसारख्या नजरेने माझ्याकडे पाहत राहतात. मला त्या खूप हव्याहव्याशा वाटतात. कधीकधी त्या स्वतःला माझ्या स्वाधीन करतात. त्यांना मी काही काळापुरतं त्यांचं मनोरंजन करणारं एक विक्षिप्त विनोदी पात्र वाटतो.

परत जाण्याच्या विचारांनी मला झपाटून टाकलं आहे. मी हा विचार पुढे ढकलतो, अनंत काळासाठी अजूनअजून पुढे ढकलतो. घडून गेलेलं वास्तव

पुनःपुन्हा समोर येण्याची भीती आणि माझ्या देशाच्या वेशीपाशी सोडलेली दुःस्वप्नं पुनःपुन्हा दिसण्याचं ते भय! माझं लहानपण ज्या भागात गेलं, जिथे मी माझ्या कुटुंबासोबत आणि माझ्या मित्रांसोबत आनंदात जगायचो, ज्या गल्लीच्या कोपऱ्यावर माझं घर होतं, तिथे गेली वीस वर्षं मी पुनःपुन्हा जात आहे : रात्रीच्या झोपेतल्या स्वप्नात आणि दिवास्वप्नातही! बालपण सरत असताना माझ्यासाठी अशा काही खुणा ठेवून गेलं की, त्यांचं काय करावं, हे काही मला समजत नाही. सगळं बरं चालू असलं,की वाटतं या सगळ्यांमुळेच मला माझी ताकद आणि संवेदनशीलता मिळते आणि रिकाम्या बाटलीच्या तळाशी पोहोचल्यावर मात्र माझ्या आजूबाजूच्या जगात मी रुळू न शकल्याची कारणं मला दिसतात.

माझं आयुष्य म्हणजे लांबच लांब भरकटणं आहे. मला सगळ्यांबद्दलच उत्सुकता आहे; पण कशाबद्दलच ओढ नाही. माझ्या आयुष्यात झपाटलेपणाच्या मिठाची कमतरता आहे. तसा मी निवांत बसून राहणाऱ्यांच्या जातीतला, स्वतःचं ठाम असं काही म्हणणं नसलेला. कधीकधी मी स्वतःला चिमटा काढून बघतो. समाजात वावरताना, काम करताना, ऑफिसमध्ये सहकाऱ्यांबरोबर असताना मी स्वतःचं निरीक्षण करतो. लिफ्टच्या आरशामध्ये दिसणारा हा माणूस मीच आहे का? कॉफीच्या मशीनजवळ उभा असलेला, सक्तीने चेहऱ्यावर हसू आणणारा हा माणूस मी आहे का? मी स्वतःला ओळखूच येत नाही. मी इतका लांबचा प्रवास करून इथपर्यंत आलो आहे, की आज या ठिकाणी असल्याच्या आश्चर्यातच मी अजून बुडून गेलो आहे. माझे सहकारी हवामान आणि टीव्हीवरच्या कार्यक्रमांविषयी गप्पा मारतात. मी त्या गप्पा ऐकत नाही. माझा श्वास कोंडतो. मी शर्टाची कॉलर सैल करतो. मला कपडे घट्ट झाल्याची जाणीव होते. मी पॉलिश केलेल्या माझ्या बुटांकडे बघतो, ते चकाकणारे बूट मला एक फसवं प्रतिबिंब दाखवतात. माझ्या पावलांचं काय झालं? ती तर लपूनच बसली आहेत. मी माझ्या पावलांना अलीकडे मोकळ्या हवेत फिरताना बघितलंच नाही. मी उठून खिडकीजवळ जातो. आकाश खाली उतरलं आहे. चिकट करड्या रंगाची पावसाची रिपरिप चालू आहे. मॉल आणि रेल्वेलाइनच्या बरोबर मध्ये अडकलेल्या त्या छोट्या बागेमध्ये एकही आंब्याचं झाड नाही.

त्या दिवशी ऑफिसातून बाहेर पडल्यावर, रेल्वे स्टेशनच्यासमोर जो पहिला बार दिसला, तिथे शिरलो. सॉकर टेबलापाशी जाऊन बसलो आणि

माझा तेहतिसावा वाढदिवस साजरा करण्यासाठी एक व्हिस्की मागवली. मी ॲनाला फोन लावायचा प्रयत्न केला; पण तिने उचलला नाही. मी प्रयत्न सोडला नाही. पुनःपुन्हा तिचा नंबर फिरवला. शेवटी मला आठवलं की,काही कामानिमित्त ती लंडनला गेली होती. सकाळी आलेल्या फोनबद्दल मला तिला सांगायचं होतं. तो फोन म्हणजे नियतीचा काहीतरी संकेतच असला पाहिजे. मला तिकडे परत गेलं पाहिजे. मनाची खात्री करून घेण्यासाठी तरी... मला झपाटून टाकणारा तो भूतकाळ एकदाचा कायमचा संपवण्यासाठी तरी, ते दार कायमचं बंद करण्यासाठी तरी! मी अजून एक व्हिस्की मागवली. बारमध्ये वर लावलेल्या टीव्हीच्या आवाजाने एका क्षणासाठी माझे विचार झाकून टाकले. युद्धाच्या परिस्थितीपासून स्वतःला वाचवण्यासाठी पळून जाणाऱ्या लोकांच्या प्रतिमा टीव्हीवरची एक बातम्यांची वाहिनी सतत दाखवत होती. त्यांच्या नशिबाचं जहाज युरोपच्या किनाऱ्याला लागताना मी पाहत होतो. त्या जहाजांमधून बाहेर पडणारी मुलं थंडीमुळे थरथर कापत होती, भुकेने आणि तहानेने व्याकूळ झालेली होती. जगाच्या वेडेपणाच्या मैदानावर ही मुलं आयुष्याचा खेळ खेळत होती. मी आरामात माझ्या अध्यक्षाच्या भूमिकेत बसून, हातात व्हिस्कीचा ग्लास घेऊन त्यांच्याकडे पाहत होतो. लोकांना असंच वाटेल की, या मुलांची नरकातून सुटका होऊन ती 'अलडोरॅडो'च्या सोनेरी राज्यात प्रवेश करत आहेत. सगळा मूर्खपणा! त्यांच्या आत वसलेल्या त्यांच्या देशाविषयी कोणी काही बोलणार नाही. कविता म्हणजे काही वास्तव नव्हे; पण तरीही माणसाच्या पृथ्वीवरच्या प्रवासात शेवटपर्यंत त्याच्या लक्षात राहील, अशी ही एकच गोष्ट आहे. मी टीव्हीवर दिसणाऱ्या त्या चित्रांवरून नजर फिरवली, ती चित्रं सत्य दाखवत होती, वास्तव नाही. ही मुलंच कदाचित एक दिवस स्वतःचं वास्तव लिहितील. हिवाळ्यात ओसाड पडलेल्या एखाद्या महामार्गाप्रमाणे माझं मन दुःखी झालं होतं. दरवेळी हे असंच होतं. दरवर्षी माझ्या वाढदिवसाच्या दिवशी जेव्हा मला आई-बाबांची, मित्रांची, बागेत बसून मगर कापून केलेल्या त्या मोठ्या मेजवानीची आठवण येते, तेव्हा एक जड उदासीनता मुसळधार कोसळणाऱ्या पावसासारखी माझ्या मनावर आघात करते.

◆

अ

भि

प्रा

य

## अमृतवेल

प्रीतीचा खरा अर्थ समजायला वासनेचाही अर्थ कळावा लागतो. वासनेत आणि प्रीतीत फरक आहे,जसा विष आणि अमृतात आहे. खांडेकरांची ‘अमृतवेल’ ही कादंबरी म्हणजे प्रीतीच्या वेलीवर बहरलेलं एक फुल आहे.

हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी पात्रं या कादंबरीत आहेत; पण प्रत्येकाची एक स्वतंत्र बाजू आहे. कथानकातलं कोणतंही पात्र हे परिपूर्ण नाही; पण त्याचसोबत कोणतंही पात्र हे गुन्हेगारही नाही.


नंदा, देवदत्त आणि वसुंधरा यांच्याभोवती कथानक फिरतं. तीन वेगळ्या व्यक्ती,वेगळ्या परिस्थितीत जगत असतात; पण तिघेही प्रीतीला पोरके झालेले असतात. देवदत्त हा वात्सल्याला पोरका असतो, त्याची पत्नी वसुंधरा ही प्रीतीला पोरकी झालेली असते,आणि नंदाच्या ठायी वात्सल्य आणि प्रीती दोन्ही असते; पण प्रीतीची आणि वात्सल्याची उधळण ज्याच्यावर करावी, अशी हक्काची व्यक्ती तिच्याजवळ नसते.

या कादंबरीत ‘वात्सल्य’ हे थेट अधोरेखित केलं गेलं नसलं, तरी त्यात या कथेचा मतितार्थ सामावला आहे. प्रीतीचे मोती ‘वात्सल्या’ च्या धाग्यात गुंफले जावेत,असे आपले विचार खांडेकरांनी या कादंबरीत गुंफले आहेत. फक्त शाब्दिक मोती वाचता वाचता, वाचकाला ‘वात्सल्याचा धागा’ सापडणं महत्त्वाचं.



ही कादंबरी वाचताना प्रीतीचा अर्थ उलगडत जातो, तसा जीवनाचाही अर्थ उलगडत जातो. ‘प्रीती’ म्हणजेच जीवन नाही का? अमृत-जे मृत नाही आणि ‘अमृतवेल’ म्हणजे ती वेल, जिच्यावर

जीवन फुललेलं आहे.




'अमृतवेल' ही कादंबरी म्हणजे काय फक्त नंदाच्या दु:खाची कथा नाही किंवा ती फक्त देवदत्त आणि वसुंधरा यांच्यात निर्माण झालेल्या दुराव्याचीही कहाणी नाही, आणि ती 'प्रेमकथा'ही वाटत नाही. तर ती साध्या सोप्या शब्दात सांगायचं झालं तर ती माणसाच्या जीवनाची कथा वाटते.

नंदा हीचा पती आकस्मिक गेल्यामुळे तिचं आयुष्य अपूर्ण असतं. तर नंदाची मैत्रीण वसुंधरा आणि तिचा पती देवदत्त हे दोघेही विवाहित असूनही, त्यांचंही आयुष्य परिपूर्ण नसतं. या ठिकाणी हा विरोधाभास दिसून येतो. स्वत:चं दु:ख विसरण्याकरिता म्हणून वसुंधरेजवळ गेलेली नंदा आणि तिथून पुढे तिला उलगडत गेलेलं वसुंधरेच दु:ख आणि त्यानंतर उलगडत जाणारं देवदत्तचं दु:ख हा या कथेचा आशय आहे.

या कथेच्या सुरुवातीला आपल्याला नंदाचं दु:ख उलगडतं तर पुढे नंदाला इतर पात्रांची दु:खं उलगडत जातात. जशी नंदाला ती दु:ख उलगडत जातात, तशी आपल्यालाही उलगडत जातात. ही फक्त त्या पात्रांची दु:ख नाहीत किंवा फक्त त्यांची ही कथा नाही. माणूस कसा आहे आणि माणूस काय आहे? या संदर्भातले यात प्रश्न आहेत मग उत्तरं आहेत, मग पुन्हा प्रश्न आहेत. ही कादंबरी वाचून आपल्याला अनेक प्रश्न पडतील; पण अनेक उत्तरंही मिळतील, हे मात्र नक्की!

**- रेणू राजीव भोसले**

## क्रौंचवध

एखाद्या पुस्तकाचं वाचन करण्यापूर्वी ते वाचायला आवडेल ना? अशी वाचकाला धाकधूक असते. पण जसजशी कादंबरी रंगत जाते, तसं आपण कादंबरीशी एकरूप होतो.

'ययाति', 'अमृतवेल' वाचताना थोडं असंच झालं.'ययाति'ची पन्नास पानं वाचून मी थांबलो. त्यानंतर इतर बरीच पुस्तके वाचली; पण 'ययाति'




'ज्ञानपीठ पुरस्कार' विजेती कादंबरी अपूर्ण वाचल्याची रुखरुख होती. बऱ्याच वर्षांनी 'अमृतवेल' वाचावयास घेतली. काही पानं उलटल्यानतंर आपलं काही चुकतंय, थोडं संयम ठेवून पुढे वाचू म्हणून वाचत गेलो. मग आधाशासारखं वाचून 'अमृतवेल' हातावेगळी झाली. नतंर मात्र 'अमृतवेल' खूपच आवडली. चूक लक्षात आली. पुन्हा 'ययाति' वाचून काढली.नंतर 'उल्का' आणि त्यानंतर 'क्रौंचवध' संपविली!

पालकांना जशी सर्व अपत्य प्रिय असतात तसंच लेखकांना त्यांनी लिहिलेले सर्व पुस्तके प्रिय असतात. पण कुणा एकाबद्दल सांगायचं, म्हटलं तर ही किंवा हा काकणभर जास्तच प्रिय आहे, असं आपण बोलून जातो. वि.स.खांडेकरांच्या सर्व कादंबऱ्या एकापेक्षा एक सुंदर, अप्रतिम आणि पुन्हःपुन्हा वाचाव्यात, अशा आहेत. पण 'क्रौंचवध' मला थोडी जास्तच प्रिय आहे, असं स्वतः लेखक वि. सं. खांडेकर लिहितात. एखादा भाव, प्रसंग, घटनेला सार्थ उपमा कशी द्यावी,हे वि.स. खांडेकरांच्या पुस्तकातून शिकायला मिळतं. पुस्तकातील संदर्भांवरूनच त्यांच्या अफाट आणि चौफेर वाचनाचा भास होतो. पदोपदि वाचण्यात येणाऱ्या उपमांवरून लेखकाने निसर्गाचं किती सूक्ष्म निरीक्षण केलं असेल, याचा अंदाज येतो. सर्वांनीच वाचावी,अशी ही कादंबरी!

**– प्रेम जयस्वाल**


◆

## नवी संहिता... नवा आशय...

## द लॉस्ट सिटी ऑफ Z

**डेव्हिड ग्रान**

अनुवाद
**मंदार गोडबोले**





अॅमेझॉनमधील हरवलेलं शहर...
त्या शहराच्या शोधात निघालेला फॉसेट...
फॉसेटच्या या मोहिमेचा विविधांगाने
घेतलेला रहस्यमय वेध

**किंमत : ४७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## द वुमन इन द विंडो

**ए. जे. फिन**

अनुवाद
**सावनी केळकर**




मी काय पाहिलंय ते मला माहिती आहे.
ते कुणी केलंय, हेही मला माहिती आहे.
आता मीच तर शिकार होणार नाही ना?
एका स्त्रीची स्वत्व जपण्याची धडपड

**किंमत : ६३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**१६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी, २०२३ दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचावर १६ ते ३१ जानेवारी दरम्यान खास सवलत.**

**१६ जानेवारी-नानी पालखीवाला यांचा जन्मदिन.**

'वुइ, दि नेशन', 'वुइ, दि पीपल'या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६७५/- । सवलत किंमत ४७३/-**

---

**१६ जानेवारी-मिलिंद गाडगीळ यांचा जन्मदिन.**

'संधिकाल' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१७ जानेवारी - मालविका आमडेकर यांचा जन्मदिन.**

'कांगारू देशीच्या गोष्टी'(४ पुस्तकांचा संच)या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**१९ जानेवारी-अभिजित कुलकर्णी यांचा जन्मदिन.**

'रेड टेप'या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२१ जानेवारी-डॉ. प्रतिभा राय यांचा जन्मदिन.**

'पूजाघर','काया' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ४७५/- । सवलत किंमत २९९/-**

---

**२१ जानेवारी-पॉल ॲलन यांचा जन्मदिन.**

'आयडिया मॅन' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**

---

**२२ जानेवारी - आर्यन कायले यांचा जन्मदिन**

'द गॉड ऑफ ॲनिमल्स' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**२३ जानेवारी-नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती.**

'नेताजी','नेताजी सुभाषचंद्र बोस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६३५/- । सवलत किंमत ४७६/-**

**२३ जानेवारी - प्रमिला जरग यांचा जन्मदिवस**

'आदिपर्व', 'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ६०९/-**

**२३ जानेवारी - बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिवस**

'एकवचनी भाग १ आणि २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५४९/-**

**२३ जानेवारी - चार्ल्स ग्लास यांचा जन्मदिन**

'ते एकाकी लढले' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

**२४ जानेवारी - मिचिओ काकू यांचा जन्मदिन**

'अशक्य भौतिकी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

**२५ जानेवारी - अश्विन सांघी यांचा जन्मदिन**

'दि व्हॉल्ट ऑफ विष्णू' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४८५/- । सवलत किंमत ३८५/-**

**२६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन**

'फ्रीडम ॲट मिडनाइट', 'मोहनदास', 'परमवीर चक्र : रणांगणावरील आपले महान योद्धे', 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया', 'महामानव सरदार पटेल', 'नेताजी','क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'सैनिक हो, तुमच्यासाठी...', 'सत्तरीतला भारत', 'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष', 'जालियनवाला बाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४६६०/- । सवलत किंमत ३०३०/-**

**२६ जानेवारी - अनिता नायर यांचा जन्मदिवस**

'लेडीज कूपे', 'विस्मरणातच सर्वकाही!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६१०/- । सवलत किंमत ३९९/-**

**२६ जानेवारी - जोनाथन कॅरोल यांचा जन्मदिन**

'द घोस्ट इन लव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २८०/-**

**२८ जानेवारी - मायकेल हेस्टिंग्ज यांचा जन्मदिन**

'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-**

**२८जानेवारी-डॉ.अरुणा कौलगुड यांचा जन्मदिवस.**

'इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझेन्टेशन स्किल्स','जगप्रसिद्ध व्हा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत २७५/- । सवलत किंमत १६९/-**

**२८ जानेवारी-डॉ. क्रेफ्लो डॉलर यांचा जन्मदिन.**

'वादळातील दीपस्तंभ' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**३०जानेवारी-पिंकी विराणी यांचा जन्मदिवस.**

'पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब', 'अरुणाची गोष्ट', 'डेफ हेवन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ८१५/- । सवलत किंमत ५४९/-**

**खालील संचांवर १ ते १५ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत**

**१ फेब्रुवारी-सोफी लगूना यांचा जन्मदिन.**

'वन फुट राँग' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

**२ फेब्रुवारी - खुशवंत सिंग यांचा जन्मदिवस.**

'माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया आणि पुरुष', 'सेक्स, स्कॉच ॲन्ड स्कॉलरशिप', 'द कंपनी ऑफ विमेन', 'मृत्यू ... माझ्या उंबरठ्याशी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ८७५/- । सवलत किंमत ५९९/-**

**३ फेब्रुवारी-दीप्ती नवल यांचा जन्मदिन.**

'द मॅड तिबेटियन : गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या!'या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**४ फेब्रुवारी - डॉ. गौरी बोरकर यांचा जन्मदिवस.**

'गर्भसंस्कार','स्थूलतेला करा टाटा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

**४ फेब्रुवारी-फेसबुक डे**

'द फेसबुक इफेक्ट' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**५ फेब्रुवारी - गिरिजा कीर यांचा जन्मदिवस.**

'आकाशवेध','जन्मठेप' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ३७०/- । सवलत किंमत १८९/-**

**८ फेब्रुवारी-जॉन ग्रिशॅम यांचा जन्मदिवस.**

'अ टाइम टु किल,''द असोशिएट','द चेम्बर','द क्लायंट','द फर्म','द पेलिकन ब्रीफ','द रेनमेकर','द पाटर्नर','द रनअवे ज्यूरी','द लास्ट ज्यूरर','द टेस्टामेंट', 'द स्ट्रीट लॉयर','द ब्रोकर','द इनोसंट मॅन'या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६०९०/- । सवलत किंमत ३११९/-**

**८ फेब्रुवारी-अब्दुल्ला खान यांचा जन्मदिन.**

'पटना ब्लूज्' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-**

**१० फेब्रुवारी-अजित जाधव यांचा जन्मदिन.**

'वास्तु-अजित' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३७९/-**

**१० फेब्रुवारी-राधिका टिपरे यांचा जन्मदिन.**

'वेरूळ लेण्यांतील शिल्पवैभव' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत २०९/-**

**११ फेब्रुवारी-स्टिफन सी. लन्डिन यांचा जन्मदिवस.**

'फिश!','फिश! फॉर लाइफ','फिश! स्टीक्स','फिश! टेल्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४४९/-**

**११ फेब्रुवारी-सिडने शेल्डन यांचा जन्मदिन.**

'चेसिंग टुमॉरो' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-**

**१२ फेब्रुवारी-दयानंद सरस्वती यांचा जन्मदिन.**

'महर्षी दयानंद सरस्वती' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ९५/- । सवलत किंमत ५९/-**

**१२ फेब्रुवारी-वैदेही यांचा जन्मदिन.**

'अशीच काही पानं...' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ८९/-**

**१२ फेब्रुवारी-राजेंद्र आकलेकर यांचा जन्मदिन.**

'कहाणी पहिल्या आगीनगाडीची' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

**१३ फेब्रुवारी-कोडी मॅकफॅदियेन यांचा जन्मदिन.**

'शॅडो मॅन', 'द डार्कर साइड', 'द फेस ऑफ डेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १४८०/- । सवलत किंमत ९९९/-**

**१४ फेब्रुवारी-व्हॅलेंटाइन डे**

**संच १**-'चिकन सूप फॉर द कपल्स सोल' 'दॅट थिंग कॉल्ड लव्ह', 'एक अनादि अनंत प्रेमकहाणी','प्रेमाची परिभाषा','अनादि-अनंत','अद्वैत','आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद','चिकन सूप फॉर द सोल टु लव्ह भाग–१ आणि भाग-२' 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग', 'प्रेमकथा', 'द प्राइस ऑफ लव्ह', 'अन्कंडिशनल लव्ह', 'देवदास' या पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ३६२०/- । सवलत किंमत २४४९/-**

**संच २ –**'फिफ्टी शेड्स डार्कर', 'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३९९/-**

◆

गोष्टींच्या नव्या खजिन्यासह सुधा मूर्तींची
लाडकी अनुष्का परत येतेय..
सुट्ट्यांच्या मौजेसोबतच
तिनं शोधलेल्या रहस्यांची रंजक सफर...



# हरवलेल्या गोष्टीचे रहस्य




लेखक :
**सुधा मूर्ती**

अनुवाद :
**लीना सोहोनी**

ebook available

**'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023**

**RNI. No. MAHMAR/2000/02739**

Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.

Publication Date : 11/01/2023 Posting Date : 11/01/2023


## नवीन संहिता... नवा आशय...




















**मेहता मराठी ग्रंथजगत**

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,

टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४


प्रति,